kantakanjali

A HANDFUL OF THORNS

by

kantakarjuna

A Collection of
New Sanskrit Verses
with
SANSKRIT COMMENTARY
and
ENGLISH & MARATHI RENDERINGS

Introductions

by

PRIN. N. G. SURU (*ENGLISH*)
PROF. A. G. MANGRULKAR (*MARATHI*)
KANTAKARJUNA (*SANSKRIT*)

aśvattha sahiti, Poona

कण्टकार्जुन-

विरचितः

कण्टकाञ्जलिः

नवनीतिशतकम्

संस्कृतटिप्पण्या
आङ्ग्लानुवादेन
मराठ्यनुवादेन च

समुपबृंहितः

अभिनवः संस्कृतमुक्तकसंग्रहः

प्रस्तावनालेखकाः –

प्राचार्य नरहर गोविन्द सुरु (आङ्ग्ल्या)
प्रा. अरविन्द गङ्गाधर मङ्गरूळकर (मराठ्या)
कण्टकार्जुनः (संस्कृतेन)

अश्वत्थ – साहिती, पुणें

Publishers : K. A. MANGRULKAR
aśvattha sāhitī
'PAMIR', 2057, SADASHIV PETH
TILAK ROAD, POONA 9.

Jacket & Illustrations : S. D. PHADNIS

First Edition : 15TH AUGUST 1965

Price : RUPEES FIVE

Printers : D. D. GANGAL
LOKASANGRAHA PRESS
1786, SADASHIV PETH, POONA 2.

प्रकाशक : क. अ. मंगरूळकर
अश्वत्थ-साहिती
'पामीर', २०५७, सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणें ९

वेष्टन, चित्रें : **शि. द. फडणीस**

प्रथमावृत्ति : १५ ऑगस्ट १९६५

मूल्य : **पांच रुपये**

मुद्रक : दि. दा. गांगल
लोकसंग्रह मुद्रणालय
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २

INTRODUCING THE KANṬAKĀÑJALI

"Kaṇṭakāñjali" or "A Handful of Thorns" composed in Sanskrit verse in the Śārdūla-vikrīḍita metre by Shri 'Kaṇṭakārjuna' is a fine masterpiece of Satire. This literary form is mostly unknown to the Sanskrit literature. The reason, perhaps, is that our Sanskrit Poets, in their literary efforts, lived and indulged in a different, imaginary, artificial world totally segragated from their practical, every-day life. Poets like Kālidāsa or Bhavabhūti, for instance, must have had a full measure of disappointments, frustrations, insults and indignities to irritate them in their normal course of life; but they never permitted their Poetic Muse to be coloured, prejudiced or poisoned by such bitter experiences, which, they thought, have to be borne with philosophic equanimity in accordance with the dictates[1] of the Bhagavadgītā! For this reason, their literary composition suffers from complete lack of realistic touch, being purely idealistic in its form and content. Hence in our critical appreciation of these earlier poets, we are often led (or misled) to imagine and invent events in their personal life,

---

1. Cf. मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥
भगवद्गीता II. 14.

agreeable or disagreeable, with a view to interpreting such suggestive utterances as we come across in their works. In short, they lived in compartments, as it were, so water-tight that no leakage of impressions of a personal character was permitted to filter through from one compartment to the other.

Another reason that may be suggested in this connection is that being mostly Court-poets enjoying royal patronage, their writings were motivated by the desire to satisfy their patron's literary tastes on which alone depended their own position of respect at the King's Court. Writing with one eye rivetted on the face of their monarch, they could not bring in topics of their own personal life in their literary efforts; but, on the other hand, they had to content themselves with such themes as would have a general, universal appeal. Even comments on contemporary public life with a view to exposing its evils, if any, would be frowned upon by the ruling monarch, since the responsibility and the blame thereof would be directly laid at his door[2]. Freedom of thought and Expression which Kaṇṭakārjuna can enjoy to-day in India under democratic conditions was practically denied to them. Their lips were sealed against any such 'Seditious' utterances and they were compelled to write only what pleased and flattered—their Master. As an exception, I know of only one Poem called "The Māhiṣa-Śataka" which is a pungent satire. Its poet,

2. Compare, for instance, remarks like this—

न राजापचारमन्तरेण प्रजास्वकालमृत्यु: चरति ।

उत्तररामचरित, II.

having been denied the patronage he had sought from a king in the neighbourhood retires in a huff to his village to live upon agriculture; and in a century of Sanskrit verses, he glorified a He-buffalo in preference to the king, because he was so useful to him for the cultivation of his land and consequently for his livelihood too!

Life in India, as depicted by our Sanskrit poets, has undergone complete metamorphosis in all its aspects. The pattern of the monarchical form of administration is replaced in our country by democracy. Religion is elbowed out to rot in a corner in its outmoded, outworn garb. Social life has lost the deep moorings it had in our ancient, traditional culture, mainly because of the impact of Western Civilisation that the British rule of over a hundred and fifty years imposed on it. We are now at crossroads, confused and undecided in the matter of preferences. Political independence of the last eighteen years has brought in its trail, more problems, more evils and more sufferings in our social, political and economic life, inspite of the efforts of our political leaders and administrators to improve our lot through phased Plans and Programmes. The individual moral fibre has snapped to such an extent that vices have now become 'virtues', while age-old virtues are objects of ridicule, derision and contempt. In fact the whole society is worm-riddled with evils of dishonesty, disloyalty, ingratitude, rank selfishness, hypocrisy, fraud, bribery, nepotism and what not. Life has lost its sense of security and every day that dawns brings in its wake the darkness of the dread of

uncertainty. The remark[3] of Kālidāsa that 'Death is Nature and Life an accident'' is but too true today than what it was in his days!

It is against such a dark and dismal background and in an atmosphere, sullen and depressing, that Kaṇṭakārjuna has written his Poems with a pointed, incisive pen. Endowed, as he is, with a gift of minute observation and equipped with a facile Sanskrit expression, he could have written, at this young age of his, such poems as would rival with, if not excel, the Śṛṅgāra-Śataka or the Amaru-Śataka, if only he had had the necessary encouragement and inspiration from his environments which the earlier Sanskrit poets commanded. Instead he writes what practically would have amounted to a Vairāgya-Śataka, but for its bitter sarcasm sugar-coated in light-hearted humour. Quite amusingly he calls his Poems "Kaṇṭakas" or "Thorns" of which he has 'a handful' to offer[4]. He has picked them up on the paths of his life's journey, because they sorely pricked the thin-skinned soles of his tender, sensitive feet and caused him some irritation. He thought it fit, however, to present them to us, assuring us that[5] 'we who know

3. मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।

रघुवंश, VIII. 87.

4. The total number is : 100 + 'Bonus'.

5. Cf. केयं व्याकुलता 'तुदेयु'रिति ? न क्षिण्वन्त्यमी कण्टकाः
काव्यज्ञान् विबुधानलौकिकरसं दृष्ट्वैव तृप्यन्ति ये ।
ये चाप्युन्नतकन्धराः पृथुपदाः पूर्णप्रशस्तोदराः
दुष्प्रेक्ष्याश्चिरकण्टकप्रणयिनस्तेषामलं चिन्तया ।।

Page 5.

would suffer no harm from them, while those for whom they are intended are too thick-skinned to feel their pricks'.

These 'thorns' Kaṇṭakārjuna has gathered from various walks of life, from different fields of activities in various spheres such as political, social, religious, economic, academic and domestic in which our total life is distributed. With an alert mind and a watchful, discerning eye, he surveys these fields as he traverses over them and spots the ills and evils thereof to convey them to us in a telling language full of eloquent significance and suggestion.

Look at the vast and wonderful variety of themes he has selected for satirical treatment. In the field of politics, whatever his idealogy, he is sorely touched by the onslaught of Chinese aggression and Pakistan's overbearing, bullying bluster towards India. According to him, they are the evil consequences of our 'weak, meek, spineless' Foreign Policy which, relying on the Pañcaśīla doctrines, follows the course of appeasement, negotiations and protests against serious violations committed by the enemy. The Party in Power is not spared by him and the Governmental Administration, both at the Centre and the States receive at his hands a full measure of sarcastic blast. Their Five Year Plans and 'fantastic' Policies of Prohibition, Gold control, Land Ceiling and Tenancy Acts, Nationalisation, huge borrowings from Western Countries, etc. have all been commented upon with a sceptical mind and mood, while the inefficiency in administration resulting in higher prices and consequent economic pinch, shortage of food and other

essential commodities, scarcity of kerosene and sugar and the long queues of the people to procure them, journeys on crowded trains, fickleness of electric current are all noted by him with refreshing humour not free from sarcasm. Our political leaders and chiefly the Ministers who, according to him, are a class by themselves, are presented with bouquets of 'roses' which, while they would prick the hands that give, would bleed the hands that receive[6]!

Such, according to him, is 'our Democracy where[7] even a Christ may be hanged while a man fit for the gallows may become a minister; where Hypocrisy is the Holy Guru, and suppression of the opposition is fair Justice! This is no surprise, however, since Democracy is acknowledged to be the joint rule by demagogues and their favourites' !

Coming down from high politics to the Social sphere, he lays his pointed finger on the various evils that have crept in our society and have now proved

---

6. Cf. मन्त्री तस्करमाह कोऽपि 'शठ रे ! लोकैः श्रमेणार्जितं
   वित्तं भित्तिविभेदनेन हरसे, धिक् त्वां जनद्रोहिणम् !' ।
   पूर्वं प्राह परः, 'कथं जनधनं त्वं भित्तिभेदाद् विना
   गृह्णीषे च न दण्ड्यसे च ? भगवन् ! शिष्योऽस्मि ते
   शाधि माम्' ॥ P. 18.

7. Cf. ख्रिस्तोऽप्यत्र भजेत वध्यपदवीं, वध्योऽपि मन्त्री भवेत्,
   दम्भो धर्मगुरुः, विपक्षदमनं न्यायश्च, केयं कथा ? ।
   लोकान् यः स्ववशे करोति पुरुषः, तस्याथ ये वल्लभा
   तेषां यद् वशवर्ति शासनपदं, तल्लोकतन्त्रं स्मृतम् ॥
   P. 13.

a veritable menace to our social life. Mercilessly he whips the hooligans who throng the streets to loot and plunder on the very day a great man dies and the Goondas who move about freely and fearlessly[8] 'under the protection of the police and the patronage of ministers'. He is equally harsh with hoarders of black money and those who indulge in black marketing. Bribery he condemns likenin it to an imperishable Aśvattha tree[9] which no one – not even Nanda– could uproot ! In fact, he bitterly deplores the devaluation of virtues and deterioration of all life's values, as he bids farewell[10] to all the good things of life. The voice of satire now comes down to a lower key when he speaks of doctors charging heavy fees, of

---

8. Cf. मन्त्री राष्ट्रसभा च यस्य पितरौ, आरक्षका भ्रातरः,
कारासौ भगिनी, सुरा च गृहिणी, लक्ष्मीः शुभाङ्गी सुता ।
न्यायेशः श्वशुरश्च यस्य विधिविच्छचालः, कुठारः सखा,–
तस्यास्यामवनौ – नहि, त्रिभुवने – गुण्डस्य कस्माद्
भयम् ?।। P. 37.

9. Cf. ऊर्ध्वं मूलमधश्च यस्य वितताः शाखाः, सुवर्णच्छदः,
कस्योत्कोचतरुर्जगत्यविदितः, यद्यप्यरूपोऽगुणः ? ।
छेत्ता कश्चिदुदेति संसृतितरोः, छेत्तास्य वृक्षस्य तु
नाभून्नास्ति न वा भविष्यति पुमान् ! अश्वत्थ एषोऽक्षयः ।।
P. 15.

10. Cf. मातर्मानवते ! पितः पशुपते ! भ्रातः स्वधर्म ! प्रिये
लज्जे गेहिनि ! पुत्र धैर्य ! दुहितर्भूतानुकम्पे ! क्षमे ! ।
शास्त्रादेश सखे ! नमोऽस्तु, सकलानामन्त्रये, स्वस्ति वः !
व्युच्छिन्नाखिलबन्धनः परमितो लीये धनब्रह्मणि ।।
P. 113.

fathers demanding dowry the amount of which soars in a spiral in accordance with the qualifications of their sons, and he is certainly in a relaxed, happy mood of humour when he describes a young man in search of a bride, giving his refusal[11] to many a young girl one after another on some flimsy grounds and ultimately accepting one whose only qualification is that she is a female!

In matters religious, he holds no brief for any particular religion, since, according to him, they are just fibs of imagination and, therefore, equally true or otherwise. He flays, however, a 'spiritual' fake who poses as a 'Sad-guru' and trades on his mesmeric powers like a magician. What irks him is the fact that our temple-gods, i.e. idols, are being prostituted by the temple-attendants for considerations of money[12]. He would have been well advised to refrain from his fling at the Muslims, as it is likely to be misunderstood as an outburst of the communal bias,

---

11. Cf. 'कन्येयं बहुलक्षपाभ्रधवला सेयं न विद्यावती,
नासौ रूपवती, न सास्ति सुदती, ह्रस्वेयमेषोन्नता ।
एषा लोमवती, दरिद्रतनया मै'वं हि कन्याशतं
प्रत्याख्याय वरोऽधुनाह, 'नवरं कन्यास्तु, सिद्धोऽस्म्यहम्' ।।
P. 144.

12. Cf. अक्ष्णैकेन विलोकने दश, तथा द्वाभ्यां कृते विंशतिः,
षष्टिर्गन्धविमर्दने, स्रज उरस्याधापने द्वे शते ।
शुल्कं रूप्यसहस्रमर्धकटिकाभोगार्थमित्यादिभिः
धूर्तैः संप्रति कुट्टनीव्यवसितैर्देवोऽपि वेश्यीकृतः ।।
P. 174.

although from a literary point of view, these verses are good specimens of pungent satire.

In the academic field, he has much to say and to criticise, as he belongs to the teacher's profession. The present-day student has been beautifully caricatured by him in a humorous strain and the lot of a professor who essays to write and approaches a publisher for publication is graphically portrayed. The college girl on a picnic, refusing to sing[13] in a group when called upon, but finding her musical voice later in a running train on the return journey is beautifully described. Engaging himself in the controversy that has ranged over "What is obscene?", he offers a very interesting solution[14]: "Obscene is that in which all are interested; all the rest is decent".

After having finished his flights through various avenues, outside and abroad, and having packed and picked up a bundle of 'Thorns', he comes home to roost. Kaṇṭakārjuna now is a different man, at home and in his family. With that Kālidāsian warmth of affection of a father, he hugs his child to his bosom and showers 'pricking' kisses on her as she

13. Cf. उक्ते ' गायत गायते 'ति सखिभिर्निर्बन्धपूर्वं पुरा
'नें 'त्येव प्रतिवक्तुमाननततिर्या स्म स्फुरत्यस्फुटम् ।
सै[illegible]द्गायति साम्प्रतं खडखडद्रेल्वेगवाक्षाद् बहिः;
श्रोतारस्तरवः, ततानि मरुतः, तालश्च चक्रध्वनिः ! ।।
P. 137.

14. Cf. तत्त्वं तेन समासतो विवृणुमः, – सर्वेऽपि यत्रोत्सुकाः
अश्लीलं, तदुदीर्यते; यदितरत् श्लीलं तदाख्यायते ।।
P. 168.

lisps her protest. He takes us into confidence when he tells us what an 'ideal' husband[15] should be like and what a husband would like his 'ideal' wife[16] to be. It would be foolish and presumptuous on our part to ask him — and more so if we asked his wife — what their experiences Vis-a-Vis each other are. But we can draw inferences, relying on the fact that one writes from experiences and this being a satire, what has been stated by him are just ironical 'expectations' or mere 'dreams', like the one he has recorded earlier[17].

In such a state of dreaming, the glamorous Cinema actress getting fabulous money for her work on the screen flashes across his mind and he has a

---

15. Cf. आहूतः सकृदेव यः प्रचलति स्नानाय भोज्याय वा,
नादिष्टः समये हरत्यथ चहाशाकादिवस्तूच्चयम् ।
वक्त्यल्पं, न निषेधति व्ययविधौ, रक्षत्यपत्यं मुदा, –
कस्याश्चित् क्वचिदेव भाग्यवशतो भर्ता भवेदीदृशः ॥
P. 151.

16. Cf. नाश्रान्तं, यदि वक्ति; विघ्नयति वा कार्ये न भट्टारकं,
नैनं लुम्पति, नापि पृच्छति 'कुतः क्वार्थे धनस्य व्ययः ?' ।
निद्राणं सहते, न शास्ति, रुचिरं श्रीणाति खाद्यं सदा, –
कस्यापि क्वचिदेव भाग्यवशतो भार्या भवेदीदृशी ॥
P. 152.

17. Cf. चौपाटीपुलिनेऽभिनीय सुचिरं शबूम्ककम्बुग्रहं,
सेतुं सैकतमारचय्य, सुभगा जङ्घाश्च नेत्रैः पिबन् ।
सानन्दं नगरीमहोदररिचः पार्श्वे प्रणाल्याः स्थितः
खादन् भेलपुरीं पुरो बलिभुजां नेष्येऽपराह्णान् कदा ॥
P. 138.

dig at her too[18]. He feels sleepy now and therefore, before going to bed, he recites the following benediction and closes his eyes in sleep :—

शं नः सन्त्विह मन्त्रिणः, शमपि तद्द्वाररक्षिणः सन्तु नः,
शं गुण्डाः, भिषजश्च शं, धनहराः शं, शं च नो रक्षिणः ।
शं नः सा पुरपालिका, शमपि नः कृष्णापणाधीश्वराः ,
शं नः कर्मकराः, नमोऽस्तु व इदं, मा नो वधिष्टेश्वराः ! ॥

This is 'Kanṭakāñjali', of which Shri Kanṭakārjuna is the 'Ṛṣi' or the Seer, which truly he is. Possessed of a sensitive heart and mind and a soul, crystal-clear and pure, he projects pictures of the sad state of affairs which prevails in our country and which has greatly distressed and tortured his mind. Steeped in Sanskritic language and literature, we love to revel in the Kālidāsian glory that India was and hence it is difficult for us to reconcile with what is happening now round about us. This is, therefore, a Patriot's cry of Grief alternating with Rage that finds a devious outlet in the form of a satire that makes this Kanṭakāñjali.

A word about the language and the style of the Kanṭakāñjali. There has lately been a considerable up-heaval in Sanskrit writing. We have periodicals

18. Cf. 'दृष्ट्याकेकरया शतं, दशशतं गत्या नतोन्नीतया,
लक्षार्धं किल नर्तनैः, परिमितैर्वस्त्रैश्च लक्षद्वयम् ।
सा कापि प्रतिचित्रमर्जति बत ! द्रव्यं सिनेसुन्दरी !
किं चाभ्रंलिह' – सर्वमस्तु, वद सा भोज्यं कियत् खादति? ॥
P. 179.

in Sanskrit which present good articles, poems, discussions and dramatic pieces. Sanskrit translations of a few Marathi dramas have also seen the light of the day and blazing, artificial light of the night, when performed on the stage. In many of them, however, the Sanskrit garb is too thin and transparent to cover up the Marathi idiom and even its vocabulary. Kaṇṭakārjuna has avoided this temptation of writing in 'Marathicised' Sanskrit. According to me, his is the best literary effort which preserves in tact the chaste purity of the Sanskrit language. He has, no doubt, borrowed many words from other languages without bothering to find counterfeit Sanskrit coins for them; but it is delightful to find that, when read in the Sanskrit set-up in his verses, they do not jar your ears as Unsanskritic. He shows a remarkable grip over his Sanskrit expression on the strength of which he could tackle with ease topics of every-day practical life in all varied aspects, for which practically no vocabulary can be inherited from earlier Sanskrit writers. His skill in versification is, indeed, masterly. No redundant word, not even a particle, has been used and utilised by him for the sake of the metre. The verses flow from his pen in majestic dignity in the long Śārdūla-vikrīḍita metre which often tests a poet's skill in versification. The Poems are mostly in the Kālidāsian Vaidarbhī style, simple, lucid, pleasing and easy to understand the import thereof, except those in which he plays up etymological jugglery to out-Pāṇini the great grammarian Pāṇini. In this connection, I specially commend the two most beautiful poems couched in his child's lisp in Sanskrit. They are so soaked in father's affection

that even Kālidāsa would be moved to read them. I quote them below :—

'यक्तां तात फुगां गिहान, बयपीम् आम्ब्यत्य माम् आनय,
त्योकं पाथय नूतनं, कथय वा क्युत्नत्य मय्यं कथाम् ।
तुय्यं देवं नमच्चकयोमि, तुमती तातत्य मे दीयतां' –
मा भूत् साधुपदप्रयोगसुकृतं, जाते ! प्रियं ते वचः ॥
सायं द्योतितदीपवन्दनविधेरूर्ध्वं जनन्योदितं
'तातादीनधुना नमस्कुरु सुते !' वत्सा च भक्त्यानमत् –
अम्बां तातमथानयोः पितृगणं भ्रातॄन् स्वसॄः किंकरान्
मार्जारीं शुकमप्यहो ! **समदृशे बाल्याय तस्मै नमः ॥**

In the end, I offer my felicitations to Shri Kaṇṭakārjuna on this poetic production of a novel Form in Sanskrit. I have no doubt, Sanskrit literature will be enriched by his Kaṇṭakāñjali. His unique 'Magnum Opus' on Mammaṭa's Kāvyaprakāśa which he produced in collaboration with Prof. A. G. Mangrulkar, proved a valuable contribution to the learned literature of India. I hope and trust that similar contributions of this and other types will follow from his pen.

I conclude now in the words of the Camel, the Presiding Deity of these Poems :—

भोः कण्टकार्जुन ऋषे, वितरामि भद्रं;
दत्तं त्वयाञ्जलिमिमं शितकण्टकानाम् ।
आस्वाद्य मे प्रमुदतो भृशमन्तरात्मा,
क्वाथेन चाथ गतरुग् भवितुं समीहे ॥

N. G. SURU

Poona. 2nd July, 1965.

परिहास आणि उपहास

एकदा एक रुग्णाईत वैद्याकडे आपली प्रकृति दाखविण्यासाठी गेला. त्याने आपल्या प्रकृतीची तक्रार काय ती सांगितली. वैद्याने तपासणी केली; आणि त्याला औषध देऊन आठ दिवसांनी परत येण्यास सांगितलें. पण रुग्णाईत दुसऱ्याच दिवशीं पुन्हा हजर. वैद्याने विचारलें, "काय झालं ?"

रुग्ण : कांही नाही. आणखी औषध द्या.

वैद्य : आं ? काय म्हणतां ?

रुग्ण : होय. औषध संपलं.

वैद्य : अहो, पण मीं आठ दिवसांचं औषध दिलं होतं.

रुग्ण : असेल. पण तें एका दिवसांतच संपविलं मीं.

वैद्य : तें कसं ?

रुग्ण : अहो, तें फार छान, चविष्ठ होतं.

वैद्य : भले ! असं कसं केलं ? असं करून कसं चालेल ?

रुग्ण : बरं ! यापुढे करणार नाहीं. – औषध द्या.

वैद्य : पण आता आठ दिवसांचं नाहीं देणार. रोजच्या रोजचं देईन.

रुग्ण : चालेल हो. तक्रार नको. – द्या.

वैद्य : भले ! तक्रार कुणाची ? माझी कीं तुमची ?

रुग्ण : जाऊं द्या हो. मला मोकळं करा.

वैद्याने त्याला एक दिवसाचें औषध देऊन वाटेला लाविलें. पण रोगी दुसऱ्या दिवशीं आलाच नाही. तिसऱ्या-चौथ्या दिवशींहि उगवला नाही. आठ दिवसांनी प्रकटला. तेव्हा –

वैद्य : काय हो, आलांच नाही तुम्ही. मला वाटलं, –

रुग्ण : 'चचलां ! ' होय ना ?

वैद्य : छे हो. भलतंच !

रुग्ण : अहो वैद्यबुवा, तुमचं हें काय औषध कीं सोंग ?–किती कडू ! अहो, घोटेना !

वैद्य : असूं द्या. पण प्रकृति कशी काय आहे ?

रुग्ण : ती आता छान आहे. एकाच पुडींत रोगाचा अगदी मटका बसला !

वैद्य : झालं तर ! काम झालं तुमचं.

रुग्ण : नाही. तुमचं तें पहिलं चविष्ठ औषध द्या !

वैद्याने तें औषध दिलें कीं नाही, तें ठाऊक नाही. पण त्या रुग्णाप्रमाणेच मीं हा 'कण्टकाञ्जली'चा काढा दोन प्रकारांनी गेले कित्येक दिवस घेतला आहे ! कण्टकार्जुनाने दहा-बारा श्लोकांचे कांटे द्यावे, आणि मीं ते लगेच फस्त करून ढेकर द्यावी. मग त्याने एखादा बारीकसा द्यावा. मीं तो चोखून-रसवून खावा, आणि अधिकाची मागणी करावी. त्यांतला एखादा खुपावा, बोचावा, सलावा. तरी 'हाय !' करून जिभेला फटका देणाऱ्या झणझणीत पण चवदार लोणच्याप्रमाणे तो मटकवावा ! इकडे प्रकृति तुंद व्हावी ! जीभ खवळावी ! सराट्यांचा काढा दिल्याने बाळंतिणीची कंबर लेचीपेची असली, तर अगदी भक्कम आणि कुटकुटीतशी होते, म्हणतात. त्याप्रमाणे ह्या कण्टकांनी आपलीहि वाङ्मयीन प्रकृति –आणि व्यावहारिकदेखील– निकोप झाल्यावाचून खचीत राहणार नाही.

पण स्नायु बळकट होण्यासाठी नृत्यकला शिकावी असें जसें मला केव्हाहि वाटलें नाही, किंवा फुप्फुसें दमदार होण्यासाठी आणि मग ऑलिंपिक सामन्यांत भाग घेण्यासाठी संगीताचा अभ्यास करावा असें जसें मी कधी म्हणणार नाहीं, त्याप्रमाणेच वाङ्मयीन अथवा लौकिक प्रकृति सुधारण्यासाठी 'कण्टकाञ्जलि' वाचावी, असा सल्ला मीं कधीहि देणार नाहीं. कारण 'कण्टकाञ्जलि' आणि 'शनिमाहात्म्य', 'व्यंकटेशस्तोत्र', 'शिवलीलामृत' यांची रास

कांही एक नाही ! स्वत: अर्जुनपण्डिताने जरी 'दम्भोद्धारण' हा 'कण्टकाञ्जली'चा विनियोग म्हणून दिलेला असला, तरी पण्डितांवर या बाबतींत फारसें विसंबू नये ! त्यांत परिहास किती आणि सत्य किती, हें निवडणारे निवडोत. अर्थात् कण्टकाञ्जलीची सर्वसाधारण सहेतुकता झाकून-पाकून ठेवण्याचें कांही कारण नाही; परंतु संस्कृतांतील विडम्बनप्रकाराचा उपहासपर असा एक मनोज्ञ आविष्कार म्हणूनच या 'कण्टकाञ्जली'कडे पाहिलें पाहिजे. 'उपहास' हा या रचनेचा स्थायिभाव आहे; आणि 'विडम्बन' हा वाङ्मयीन प्रकार आहे. उपहास आणि विडम्बना यांची लग्नगांठ तर विधात्यानेच घालून दिली आहे. आणि हीं वधूवरें खरोखरच एकमेकांना मोठीं अनुरूप आहेत. हा 'जोडा' कुरकुरत नाही ! तथापि मराठींतल्या 'झेंडूच्या फुलां'सारखें या विडंबनाचें स्वरूप बव्हंशीं परिहासपर असें नाही. तें प्राधान्याने उपहासपर आहे. ('परिहास' आणि 'उपहास' यांत फरक करणें योग्य ठरेल.) टोचण्यापेक्षा यांत कापण्याच्या जागा जास्त आहेत. विसंगतींपेक्षा त्यांत पराण्यांचीं व आसुडांचीं स्थळें अधिक आहेत. (आणि 'बैलजोडी'ला त्यांचीच आवश्यकता जास्त असते, हें जसें एखाद्या शेतकऱ्याला, तसें राजकीय पक्षांनाहि ठाऊक आहेच !) 'कण्टकाञ्जलीं'त गुदगुल्या आहेत, पण त्या अस्वलाच्या गुदगुल्या आहेत ! आणि त्या उघडच निरुपद्रवी नाहीत. 'कण्टकाञ्जलीं'त वांकुल्याहि दाखविलेल्या आहेत; जिभा काढून दाखविलेल्या आहेत; जणू कांही सहज म्हणून नाक खाजविलेलें आहे; (त्याने एखादें नकटें वरमलें, तर अर्जुनपण्डित काय करणार ?) आणि इतरहि पुष्कळ गमती केल्या आहेत, — शैलीच्या आणि आशयाच्या.

संस्कृत वाङ्मयाची अनेक सहस्रकांची प्रदीर्घ परंपरा लक्षांत घेतां त्यांत ललितवाङ्मयप्रकारांच्या विविधतेचें दुर्भिक्ष कोणालाहि जाणवेल, एवढें मोठें आहे. त्यांत विनोदाचें वावडें नाही, पण त्याचा एक ठसा बनवून ठेविला आहे. या ठशाच्या बाहेर येणारें विनोदाचें शिरवें क्वचितच. कधीतरीच एखादी मोठी सर येते; आणि ती

येऊन गेली की, शेकडों वर्षें मग सारें कसें शांत-शांत असतें. संस्कृतांत कादंबऱ्या नाहीत. एकच 'कादंबरी'! मराठींतल्या कादंबरी-प्रकाराचें मूळपीठ! नाटकांची संख्या फार थोडी; आणि उपहासपर रचनांची संख्या तर इतकी कमी कीं, तीं संख्या आपल्याला खरोखर थोटय़ा हाताच्या बोटांवरच मोजावी लागेल!

मग संस्कृत साहित्यांत दिसतें काय? – जिकडेतिकडे नीट-पणानें व्यवस्थित कापून काढलेल्या बागाच-बागा! त्या बागांत पुष्करिणी आहेत; पुष्करिणींत राजहंस पोहत आहेत; त्या राजहंसांच्या चोंची सोन्याच्या आहेत; आणि त्या चोचींत त्यांनी मोत्यांच्या माळा घेतलेल्या आहेत! या संस्कृत साहित्यांत नितांतसुंदर सरोवरें आहेत; मादक चंद्रशाला आहेत; विशाल नगरें आहेत; शाही दरबार आहेत; भव्य राजवाडे आहेत; धनाढय कुबेर आहेत; अप्रतिम लावण्य-लतिका आहेत; . . .

पण एखादी गरिबाची खोप? – नांव नको!

बरें, एखादा खंगलेला जख्ख म्हातारा? – एक; मात्र एकच!

पडकीं घरें? – तीं कशाला? त्यांत कोण राहणार?

जुनाट बागा? – एक पुरे!

समुद्र? – एखाददुसरें दर्शन पुष्कळ झालें! शिवाय, 'किं सुखम्? अप्रवासगमनम्' हें काय माहीत नाही?

अशा स्थितींत प्रस्तुत रचनेसारखें एखादें विचित्र पण घाटदार कांटेरी झाड दिसलें, म्हणजे विलक्षण रुचिपालट होऊन कॅक्टसप्रमाणे त्याचें किती कौतुक करावें, असें होऊन जातें. कारण संस्कृताच्या उद्यानांत कांटयांना जागा नाही! आहेत ते कांटे फक्त कौटिल्याचें 'कण्टकशोधनम्' यांतल्याप्रमाणे लाक्षणिक अर्थानेच आहेत! वाच्यार्थानें नव्हेत.

वाङ्मयांतल्या उपहासवृत्तीच्या आविष्काराचा एक विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे. ही उपहासवृत्ति नेहमी जीवनाला अस्तरा-

सारखी चिकटून असते. उपहासाला जीवनावर रेलावेंच लागतें. साहजिकच हें टेकण निघालें किंवा थोडें डळमळलें, म्हणजे तो उपहासहि तितक्या प्रमाणानें ढळतो. विनोदानें असें रेललें नाही, तरी चालतें. व्यवहारांत जाणवलेली एखादी नापसंती किंवा अप्रसन्नता, वास्तव जीवनांतली एखादी विसंगति किंवा दांभिकता, आजकालच्या वृत्त-पत्रांतल्या एखाद्या वार्ताकणाने बसलेला टचका किंवा चटका, विद्यमान समाजांतली एखादी अनिष्ट किंवा घृणास्पद घटना, ... अशा गोष्टी जेव्हा वाङ्मयाच्या शिळाखंडांतून वाट काढूं पाहतात, तेव्हा त्या उपहासाच्या हसत्या-फेसाळत्या-लपकत्या पाण्याच्या रूपानेच उसळतात. अर्थात् त्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षतया वास्तव घटितें, वा समाज, वा जीवन, वा राजकीय पक्ष, वा देशांपरदेशांतलें ठिकाण इत्यादिकांशीं संबंध असणार, — नव्हे, असला पाहिजे, हें उघड आहे. येथे 'कण्टकाञ्जली'त असेंच दृश्य दिसतें. तींत इंग्लंडांतली वेश्या क्रिस्ताइन् कीलर अवतरलेली आहे; काश्मिरांतल्या हजरत-बालाचें प्रकरण तोंड दाखवून गेलें आहे; जयपूरला झालेल्या मद्यमय A.I.C.C. -ची पद्यमय आवृत्ति काढलेली आहे; मोरारजींचें सुवर्णनियमन आलें आहे; आपले गृहमंत्री गुलझारीलाल नंदा दिसत आहेत; तसे पाकचे परराष्ट्रमंत्री झुल्फिकार अली भुतोहि भेटतात; लक्ष्मीबाई मेननचीं पार्लमेंटमधली मोघम, डगळ, शिराळशेटी उत्तरें गाजत आहेत. कृष्ण मेनन तर अर्थातच आहेत; साखरेची टंचाई आणि लाचेची विपुलता, दोन्ही भरपूर आहेत; गांधीजींच्या खुनाविषयीचें केतकरी प्रकरण आहे; भूगोलचुकांचा ग्रंथ आणि त्याची 'अर्थ'संगति आहे; श्लीलाश्लील-विवेक आहे; पुण्यांतल्या वीजबाईचें डोळे मिचकावणें आहे;— एक-ना-दोन, कितीतरी! असा कांश्मीर-इंग्लंडपासून पुण्यापर्यंतचा प्रवास आहे. वावडें असें कोणत्याच विषयाचें नाही. कण्टकार्जुनाला कोणताहि देश विदेश नाही; कोणताहि विषय अविषय नाही. शिकारी जसा सावजाचा माग सोडीत नाही, तसा कण्टकार्जुनानें जीवनाचा अथवा समाजाचा मागोवा कोठेहि सोडिलेला नाही. त्यामुळें ही रचना जीवनाच्या ओलंब्यांत बांधलेलीशी वाटते. त्याच-

मुळे तींत पुष्कळसा खारट-तुरट-तिखट असा मसालेदार भाग आलेला आहे. यापुढे जाऊन आपल्याला असेंहि म्हणतां येण्यासारखें आहे की, जीवनाची अशी ही लय सुटल्यामुळेच संस्कृत वाङमयाची वावडी विशिष्टच दिशेने आकाशांत उंच-उंच गेली, एकसुरी बनली, आणि उपहास - विडंबनपर आविष्काराला आंचवली. नहून, संस्कृत साहित्यांतल्या थोर प्रतिभावंतांना एवढ्या दीर्घ परंपरेंत आणि काला-वधींत हें थोडेंच दुष्कर होतें ? जीवन हा उपहासाचा केवढा तरी, – नव्हे, एकमेव – आधार आहे. विनोदाचा किंवा परिहासाचा एक वेळ साचा बनविता येईल. (संस्कृतांत तसा तो बनविलेलाहि आहे.) विनोद हा जीवनापासून तुटून वेगळा संसार मांडू शकेल. पण उप-हासाचें शस्त्र मात्र समाजजीवनाच्या तेजक पाषाणावरच पाजवितां येईल. तोच त्याचा आधार; तोच त्याचा कच्चा माल; तोच त्याचा निकषहि. आपल्या आजच्या जीवनांत उपहासाला जेवढें भरपूर खाद्य आहे, तेवढें खाद्य कण्टकार्जुनाला दुसऱ्या एखाद्या वेळीं क्वचितच मिळालें असते. त्यामुळे अर्जुनपण्डित जोगावला आहे ! आजच्या जीवनाचे स्वरूपच असें धालमेलीचें, ओढाओढीचें, घालघसरींचें आणि धक्काबुक्कीचें बनून गेलें आहे की, एखाद्या सरळ वृत्तीच्या माणसालादेखील टर किंवा कुचेष्टा सुचावी. मग कण्टकार्जुनाला ती सुचेल, यांत काय नवल ? एका दृष्टीने कण्टकांचें पीक ही जशी कण्टकार्जुनाची निर्मिति आहे, तसाच तो अद्यकालीन 'जीवन'-खताचाहि महिमा आहे. एक शेतकरी, दुसरी जमीन ! मात्र श्रेय शेतकऱ्याचे ! बक्षीस त्यालाच ! कारण कसेल, त्याचीच जमीन ! (पहा : पृ. ३३.)

उपहास जेव्हा वाङमयांत व्यक्त होतो, तेव्हा उपहासाचा विषय आणि उपहासक यांचें विशिष्ट नातें आपल्याला नेहमी जाणवत राहतें. या नात्यांत दोन प्रकारची मौज असते : एक, उपहासकाचें मन, मत, त्याचा युक्तिवाद आणि तर्क यांच्या वरचढपणाची जाणीव; दोन, उपहास्य विषयाचा गैरपणा, अतार्किकता, दांभिकपणा आणि ढिसाळपणा याविषयीची तुच्छता.

मात्र अशा वेळीं उपहासकाला विषयाविषयीचा एक साक्षेप जरूर बाळगावा लागतो. तो असा की, विषयाच्या कच्चेपणाबद्दल लेखक-वाचकांत त्याने दुमत ठेवितां कामा नये. कारण वाचकानेच जर उपहास्य विषयाला अनुकूल अशी बाजू घेतली, तर उपहासाच्या दरडी उघडच ढासळूं लागतील. उपहासविषय हीं खलपात्रें बनलीं पाहिजेत. लाच, हुंडा, शत्रु, नशाबाजी, वेश्यामार्ग हीं अशीं खलपात्रें आहेत. त्यांच्या अधिक्षेपाच्या बाबतींत कोणाचें दुमत असणार? आणखी एक गोष्ट अशी की, टीकाविषयीभूत विषयाची मांडणी ही अतार्किक आणि असमर्थनीय असली पाहिजे. या संदर्भात 'नग्न-माहात्म्य' (पृ. ३१) किंवा 'श्लीलाश्लीलविवेक' (पृ. १६८) हे 'कण्टक' पहावे. कधीकधी एखादा समाजनियम अतिरिक्तपणें ताणलेला असतो ('स्वराज्य'–पृ. ३३); कधी कायद्याने उत्पन्न होणाऱ्या उफराट्या परिणामावर जमालगोटा दिलेला असतो ('सुवर्णनियमन'– पृ. २४); कधी थोरांमोठ्यांच्या दंभाचा पडदा टराटून फाडून टाकिलेला असतो (क्रिस्ताइन् कीलररूपी 'मत्स्यगंधा'– पृ. १०४); कधी एखाद्या फालतू रूढीची यथेच्छ टर उडविलेली असते ('पुष्टिमार्ग'–पृ. ११०); कधी आजकालच्या उथळ संग्राम-गीतांतली यांत्रिक ठरीव टक्केवारी सांगितलेली असते ('संग्रामगीत'– पृ. १०७); कधी सरकारी धोरणाला अंजन दिलेलें असतें ('निष्प्रेषणम्' – पृ. २६); कधी भोंदू संगीतज्ञाची हजेरी घेतलेली असते ('संगीतज्ञ:' –पृ. १०६); कधी समाजजीवनाच्या किडीवर औषध फवारलेलें असतें ('अश्वत्थवृक्ष:'– पृ. १५; 'चन्द्रस्य कालिमा'– पृ. ३६); कधी एखाद्या थोर तत्त्वाचीहि खाल काढिलेली असते ('शान्तिपारमिता' – पृ. ५०); कधी स्वदेशाच्या चष्म्यांतून शेजारच्या शत्रुतुल्य देशाचे वाभाडे काढिलेले असतात ('विपाक-पद्धति' – पृ. ६७–७७); कधी पुढाऱ्यांच्या आणि शासनाच्या तर नुसत्या धांदोट्याच उडविलेल्या असतात ('लोकाग्रणीपद्धति'– पृ. ७८–९५; पृ. १०–३२); कधी विद्यार्थ्यांना चिमटे, चपराका, छड्या असतात ('विद्याविद्यार्थिपद्धति'– पृ. ११४–१४२) आणि

त्यांतच विद्येच्या उपेक्षेसंबंधीची कडवट हळहळ व्यक्त केलेली असते. अशा प्रकारच्या वेगवेगळ्या विषयविशेषांची समग्र नोंद करण्याचें येथे कारण नाही. पण हें आवर्जून सांगितलें पाहिजे की, यांतल्या प्रत्येक कण्टकाची जात थोडीथोडी वेगळी आहे. कोठे ओरखाडा, कोठे चिमटा, कोठे चापटी, कोठे गुद्दे, कोठे श्रीमुखांत, कोठे छड्या कोठे फटके, कोठे तीव्र प्रहार, – असे त्यांत वेगवेगळे आविष्कार आहेत. हे सर्व आविष्कार वाङ्मयदृष्ट्या अतिशय रोचक उतरलेले आहेत. त्यांत सुरेख श्लेष आहेत, सफाईदार कोट्या आहेत, कुटिल कलाटण्या आहेत, शैलीदार प्रयोग आहेत, अभिनव वाग्विशेष आहेत. पण, आचार-विचारांतली विसंगति, अतार्किकपणा, स्वार्थ आणि ढोंगबाजी हें 'कण्टकाञ्जलीं'तल्या बहुसंख्य उपहासपर श्लोकांचें मुख्य अन्न आहे. या दृष्टीने पाहिलें, तर आपल्या सभोवारच्या जीवनांतल्या रोजच्या लहानमोठ्या विषयांनी कण्टकार्जुनावर, संस्कृतावर आणि आपल्यावर केवढा तरी उपकार केला आहे, हें आपल्याला निःसंकोच-पणाने कबूल केलें पाहिजे. म्हणूनच त्याने या विषयांचें आपल्या प्रस्तावनेंत शास्त्रोक्त 'तर्पण' केलेलें आहे!!

मात्र उपहासाची ही नौका जीवनाच्या कांठाकांठाने जात असल्यामुळे तिला जसा जिवंतपणाचा स्वाभाविक लाभ होतो, तसाच तिला निरंतरचा एक धोकाहि उत्पन्न होतो. उदाहरणार्थ पहा की, कांही म्हटलें, तरी अत्रे यांच्या 'झेंडूच्या फुलां'तला रंग आज बराचसा उडून गेला आहे. कालगतीने त्यांतले पेचहि थोडे ढिले झाले आहेत; आणि बारीक-बारीक संदर्भांचे त्या वेळीं महत्त्वाचे वाटणारे स्क्रू आता एकतर गंजून गेले आहेत, किंवा हरवले आहेत. तात्कालिकता हें जसें उपहास-विडंबनांचें एक अतिशय चैतन्यदायक आणि शक्तिदायक रामबाण औषध आहे, तशीच ती त्यांना लागलेली वाळवीहि आहे. आधारभूत घटना ही विस्मृतींत गेली कीं, तिच्या-वरची उपहासपर रचना ही वारा काढून घेतलेल्या रबरी फुग्या-सारखी होते. विडंबनाच्या अथवा उपहासाच्या बाबतींत कधीकधी आणखी एक गोष्ट जाणवते. ती थोडी सूक्ष्म आहे. विडंबित अथवा

उपहसित वस्तूसंबंधीची आपली भूमिका अथवा आपला दृष्टिकोण कधीकुधी पालटतो. असें झालें, म्हणजे कालगतीने तें पहिलें विडंबन जरी चैतन्यहीन झालें नाही, तरी तोकडें, टाचकें वाटू लागतें; आणि त्यांतली खुमारी अजिबात जरी गेली नाही, तरी उणावते खास. मुंजींत शिवलेले कपडे कॉलेजांतल्या वयांत घालून वावरावें, तसे ते विडंबनाचे कपडे मग दिसू लागतात. आणि मग विडंबनाने विडंबित वस्तु उपहसनीय होण्याऐवजीं विडंबनच स्वतः विडंबित होतें. उदाहरणार्थ, पटवर्धन-सावरकरांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीची त्या काळीं महाराष्ट्रांत कांही थोडीथोडकी हेटाळणी, उपहास वा विडंबना झाली नाही. खूप विडंबनें झालीं. 'बोलपट', 'कार्यवाह' हे जे शब्द आज आपण सढळपणें वापरतो, तेदेखील उपहासविषय झाले होते. पण आज इंग्रजी-उर्दू-मराठी यांच्या विषयींची आपली संकलित भूमिका पूर्वीपेक्षा फारच पालटली आहे. प्रतिशब्दांच्या किंवा परिभाषेच्या मागे धावणें हा तर आज जवळजवळ युगधर्म होऊन बसला आहे. त्यामुळे एका काळीं चुरचुरीत वाटणारीं तीं जुनीं विडंबनें हींच आज उपहास्य ठरलीं आहेत. याची दखल आज आपण कितीशी घेतों ? एकदा तिरळ्या डोळ्यांनीच बघण्याची सवय झाल्यावर सरळ डोळ्यांनीं बघणें हेंच चमत्कारिक वाटावें, तसें होतें.

यांत विडंबनाला किंवा विडंबकाला बोल नाही. कारण हा एक सनातन प्रश्न आहे; आणि तो पुष्कळ क्षेत्रांत घुसलेला असतो. मूळ विडंबनरचना उत्तम असली, सुश्लिष्ट असली, उपहासांत निंदा नसली, मार्मिकता (म्हणजे मर्मभेदकता) असली, ती खऱ्या अर्थाने निकोप असली, म्हणजे कार्यभाग संपला. याहून अधिकाची चिंता वाहण्याचें कारण नाही. 'सर्वच निर्मिति अक्षर, अनंत आणि अविनाशी असली पाहिजे, हें गृहीत तरी कशावरून बरोबर ?' असाहि प्रश्न खचीत विचारतां येण्याजोगा आहे. कारण वाङ्मयाची गुणवत्ता आणि त्याचा टिकाऊपणा हीं कांही नेहमीच समव्याप्त नसतात. गुणवत्तेचे निकष वेगळे, आणि टिकाऊपणाचीं कारणें निराळीं. तीं कधी-कधी आनुषंगिकहि असतात. म्हणून कालदृष्ट्या टिकाऊ

नसलेलेंहि वाङ्मय गुणदृष्ट्या स्पृहणीय असूं शकतें. उलटपक्षीं, उपहास-विडंबनांचा जीविताविधिच जर मुळांत मर्यादित असल्याचें सिद्ध आहे, तर 'असें वाङ्मय मर्यादितच कां? तें अमर्याद कां असूं नये?' हा प्रश्न खरें म्हणजे प्रश्नकर्त्यालाच विडंबनीय ठरविणारा आहे. एखादी फॅशन् ही चार दिवसांपुरतीच आहे, हें ठाऊक असतांनाहि 'ती तात्कालिक स्वरूपाची फॅशन शाश्वत स्वरूपाची कां नाही?' असें विचारण्यासारखेंच हें आडमाप ठरेल.

या दृष्टिकोणाने पाहिलें, आणि 'कण्टकाञ्जली'चें परीक्षण केलें, तर अगदी चोखंदळ वाचकाचें आणि साक्षेपी समीक्षकाचेंहि ती समाधान करणारी आहे, असें दिसेल. तींतले कांटेहि आपल्याला टोंचावे, असेंच वाटेल; आणि संस्कृतांतल्या अतिरिक्त गोडीनें ज्यांच्या रुचीला मिठी बसली आहे, त्यांच्या रुचींत तिने चमचमीतपणाचें नवचैतन्यहि सळसळूं लागेल ('कण्टकक्वाथ'– पृ. ९).

'कण्टकाञ्जली'त व्यक्त झालेली शैली ही विडंबनाला अनुरूप अशीच आहे. विषयाच्या बाबतींत ही रचना जशी जीवनाकडे कललेली आहे, तशी शैलीच्या बाबतींत संस्कृतांतल्या मान्यवर कवींकडे झुकलेली दिसेल. असे पुष्कळ थोर-थोर कवि येथे हळूच हजेरी लावून जातात. कांही-कांही साखसुरत, उजागरीने ठिय्या देतात. 'नीति-शतक'कर्ता भर्तृहरि हा तर येथल्या मैफलींत तंबोऱ्यावरच बसला आहे. 'पञ्चतन्त्र'कर्ता विष्णुशर्मा हा तबल्यावर आहे, आणि अधूनमधून तो पाचपेचाचे मुखडे-मोहरे, बोल-आडबोल लावून राहिला आहे. मराठींतला वामनपंडित नेमक्या वेळीं येऊन मधल्या वेळची फक्त कॉफी घेऊन जातो. 'मुद्राराक्षस'कर्ता विशाखदत्त हलकेच येऊन आपल्या लांबलचक समासाच्या तारेवरून तरातरा निघून जातो. आणि कालिदास लाजरेपणाने येऊन संकोचत डोकावून जातो. मैफलींतले सारेच राग सरळ-सोपे नाहीत. कांही तेढेबाके आहेत; कांही अनवट आहेत. पण सर्वच रागाचा आविष्कार सफाईदार आहे; त्यांत कोठे सूर गेला नाही; उच्चारण कटकटीत झालें नाही; लय बिघडली नाही. प्रत्येक श्लोकाच्या चौथ्या चरणांत मजेदार

कलाटणी घेऊन सम पडते, आणि 'वाहवा' घेऊन जाते. पण ती जसा आनंद देते, तसाच एखादा रेशमी चिमटाहि घेऊन जाते. या समेच्या आधीचें तोंड अनेक प्रकारांचे आहे असें दिसेल. तें कधी कालिदासाची आठवण करून देईल, कधी आणखी कोणाची. या सर्वांचा वाचतांना होणारा परिणाम हा वृन्दवादनाच्या वाद्यमेळाप्रमाणे मोठा सुभग होतो. विडम्बनात्मकता ही सर्वत्रच पसरलेली असल्यामुळे पुष्कळदा वर्गाच्या शांत वातावरणांत मध्येच मांजरांची कळवण केकाटत यावी तसा मजेदार विक्षेप उत्पन्न होतो, आणि एक नवेंच तिर्कस पैलूंचें वातावरण उत्पन्न होतें. आपण लहानपणीं पुष्कळदा वर्गांत अनपेक्षितपणें येणाऱ्या अशा कुत्र्यामांजरांचे खरोखरच आभार मानिलेले आहेत ! विडंबनाचें स्वरूप प्रायः असें असतें; निदान येथे तें आहे. अशा या विडंबनांत एक तर नक्कल अशी नसते; आणि असली, तरी ती तंतोतंत नसण्यांत गंमत असते. बहिर्गोल भिंगाच्या आरशामध्ये जसा आपला चेहरा हा आपला म्हणून ओळखूं येऊनहि 'वाकुडाविचुका' दिसतो, तसें विडंबनाचें ऐनजिनसी स्वरूप असतें, —असावें लागतें. थोडक्यांत म्हणजे 'कण्टकाञ्जली'तल्याच व्यंगचित्रांप्रमाणे (खरें तर 'बिग'चित्रांप्रमाणे) त्याचें स्वरूप असतें.

'कण्टकाञ्जली'च्या स्वरूपाची यावरून स्थूल कल्पना येईल. पण तींतले पाचपेच आणि वक्रातिवक्र रेषा ओळखण्यासाठी तींतले श्लोक मुळांतून आस्वादिले पाहिजेत. त्यांत कधी टांग मारिलेली असते, तर कधी पट काढिलेले असतात. पण सर्व झटपट. कुस्ती निकालीं निघते; लांबत नाही ! या सर्व श्लोकांत व्यक्त झालेली कविवृत्तिहि मला लक्षणीय वाटते. तींत कोठेहि जळकटपणा नाही. वैफल्य नाही. धुसफूस नाही. मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम्. आकसखोरपणा नाही. उत्तानपणा नाही. पुढारी काय, नेते काय, विद्यार्थी काय, विद्वान् काय, — सर्व सारखे ! पण्डिताः समदर्शिनः ! त्यामुळे वाचतांना हवा कुबट-उबट-कुजकट राहत नाही. खेळती-मोकळी राहते. संताप, चीड जरूर आहे. पण त्यांची अभिव्यक्ति चरचरीत असूनहि मजेदार आहे. मुसलमानांचा होणारा अनुनय

आणि त्यांना मिळणाऱ्या सवलती पाहून या हिंदू कण्टकार्जुनाला ईश्वरापाशीं कोणती प्रार्थना करावीशी वाटते ?– "परमेश्वरा मला एकदाचा मुसलमान कर ! त्यांत सारं आलं ! मग मला पैसा नको; घर नको; सत्ता नको." ('प्रार्थना – पृ. ४५.) याहून जहरी उपरोध कोणता असेल ? निर्यातधोरणावर असाच एक सणसणीत कोरडा 'निष्प्रेषणम्' (पृ. २६) यांत ओढलेला आहे. पोस्त मागावयाला येणाऱ्यांची आणि तें देणाऱ्यांची किती हलक्या हाताने टोपी उडविली आहे, पहा. ('पुष्टिमार्ग' – पृ. ११०.) तसेंच 'ग्रामदान, धनब्रह्म, छात्रायण, देवस्य शुल्कश्रेणी' इत्यादिकांतलाहि उपहास कधी झणझणीत, कधी सौम्य, कधी मिस्किल, कधी छद्मी, असा बहुविध आहे. जीवनांतल्या लहानसहान घटनांनीहि स्पन्दन पावणारें कण्टकार्जुनाचें मन कसें संवेदनशील आहे, तें आपल्याला यांत जाणवतें. पण त्याचबरोबर जीवनाच्या इतक्या नासक्या-कुजक्या अंगांना स्पर्श करूनहि आणि त्यांच्याविषयी इतक्या सावधपणाच्या अधिक्षेपाने लिहूनहि कण्टकार्जुनाने स्वतःच्या निकोप वृत्तीची जी जपणूक केलेली आहे, ती पाहून त्याच्या मनाची घडण चांगलीच दणकट आणि सश्रद्ध असली पाहिजे, असाहि कयास होतो. जीवनांत नित्याप्रमाणे वावरूनहि कर्मयोग्याला जसा त्यांतल्या कर्मांचा लिप्ताळा नसतो, त्याप्रमाणे.

'कण्टकाञ्जली'तल्या व्यंगचित्रांनी अथवा 'बिग'-चित्रांनी या रचनेला एक खुमारी आली आहे, हें तर कोणालाहि जाणवेल. चमचमीत पदार्थ खातांना दातांखाली कचकन् मिरचीचा तुकडा रगडावा आणि एकीकडे कानशिलें गरम होत असतांनाहि जिभेला मात्र त्याने रुचि यावी, तशीं हीं 'बिग'चित्रें आहेत. पण या रचनेला कण्टकार्जुनाने जी गद्यात्मक 'टिप्पनी' लिहिलेली आहे, तीहि मोठी चुरचुरीत-फुरफुरीत आहे. ती वाचली नाही, तर वाचक एका चांगल्या गमतीला मुकतील, असें मला वाटतें. वेलीला तोलून धरण्यासाठी तींतून जशा वेलांटया-बाळया निघतात, पण तिला एक वेगळी शोभाहि आणतात, तसें ह्या 'टिप्पनी'चें स्वरूप

आहे. अगदी पहिल्या 'मङ्गलां'तच 'गलं धरतु' यांतील 'गलः' (गळा) म्हणजे काय, त्याचें मजेशीर स्पष्टीकरण पहा : 'गलः नाम स्कन्धशिरसोर्मध्ये वधादिसौकर्यार्थं वेधसा निर्मितः वर्तुलस्तम्भ-खण्डाकारः अवयवविशेषः ।' (पृ. ४.) हें वाचल्यावर जॉन्सन्च्या कांही व्याख्यांची आठवण व्हावी, हें स्वाभाविक आहे[1]. या प्रस्तावनेचा संभाव्य विस्तार आवरण्यासाठी टिप्पनीमधल्या केवळ कांही स्थळांचाच निर्देश येथे करितां येईल : 'गुण्डाग्रणीः' या समासाचा विग्रह (पृ. ३५); 'लक्षणसंग्रहः' यावरील भाष्य (पृ. ४४); 'छत्रपतेः आगमनम्' याविषयीचें भाष्य (पृ. ८०); 'ग्रामदानम्' यावरील टीका (पृ. १११); 'संस्कृताध्येतुः आकाङ्क्षा' यावरील टिप्पनी (पृ. १२४); इत्यादि. तात्पर्य, 'कण्टकाञ्जली'ची टिप्पनी ही नुसतीच श्लोकांच्या स्पष्टीकरणासाठी लिहिलेली नाही; तर त्यांत भर घालण्यासाठी आणि नवीन स्वतंत्र आविष्कारासाठीहि ती रचिलेली आहे.

एवढ्या विवेचनानंतर कण्टकार्जुनाच्या संस्कृत भाषेच्या प्रभुत्वाविषयी वेगळें असें कांही सांगावयाला पाहिजे, असें नाही. संस्कृताचा आविष्कार जसा सफाईदार आहे, तसाच तो वेचकपणा व्यक्त करणारा आहे. त्यांत अनेक जुन्या कवींचीं 'स्मारकें' आहेत. पण ही भाषा जुनवट आणि म्हणून जखडबंद झालेली नाही. तींत आधुनिकतेने येणारा एक टवटवीतपणा आहे; ताजेपणा आहे.

---

१ जॉन्सन्ची Oats या धान्याची व्याख्या : "A gram which in England is generally given to horses but in Scotland supports the people."

कोशांबद्दल तो म्हणतो, "Dictionaries are like watches : the worst is better than none, and the best cannot be expected to go true."

Lexicographer कोण, तें सांगतांना तो लिहितो, "A writer of dictionaries : a harmless drudge."

वाचकाचें मन सतत प्रफुल्लित ठेवण्याचें आणि एका हलक्या-फुलक्या पातळीवर नेण्याचें सामर्थ्य आहे. ती कोठेहि अडचणलेली किंवा गाठाळ झालेली वाटत नाही. कालिदासाप्रमाणे येथे शब्दावर कोटया करण्याची हौस पुरवून घेतलेली आहे. त्यामुळे क्वचित् 'प्रसाद' उशिरा मिळतो! पण अशीं स्थळें मुद्दामच शोधून काढावीं लागतील. कांही असलें, तरी संस्कृत भाषा ही आधुनिकहि जीवनाचे पैलू दरोबस्त व्यक्त करूं शकते; हसूं-खेळूं, नाचूं-बागडूं शकते; अद्यकालीन जीवनांतला रस मिटक्या मारीत चाखूं शकते; हें सर्व पाहून कोणाला आनंद आणि अभिमान वाटणार नाही? एखादा तरतरीत चेहऱ्याचा देखणा पुरोहित श्मश्रू करून आणि केसांचा व्यवस्थित भांग काढून, रेशमी वस्त्रें लेऊन, स्वच्छ वाणीने निर्मळ भाषा बोलत धर्मकार्याला बसावा, तसें हें दृश्य दिसतें!

या रचनेमध्ये संस्कृत भाषेचें जें स्वरूप प्रकट झालें आहे, तें लक्षांत घेतां पालि-भाषेंतलें पद्य (पृ. ९३) तींत आलें, किंवा बाल-संस्कृतभाषेंतलें (कीं संस्कृतबालभाषेंतलें?) पद्य (पृ. १६२; पृ. १६१) तींत आलें, तर आश्चर्य मानण्याचें कारण नाही. या दोन्ही स्थळीं विषय आणि भाषा यांची अनुरूपता कशी चपखल जुळून गेली आहे. संस्कृत भाषा ही जेव्हा कधीकाळीं रोजच्या व्यवहारांत नाचत-बागडत होती, तेव्हा ती संस्कृत भाषा बोलणारीं बालकें वा अर्भकें हीं काय बोबडें संस्कृत बोललींच नसतील?–जरूर बोललीं असतील! आणि तीं बोबडेंच संस्कृत बोललीं असणार! काय तीं एकदम पल्लेदार 'बाणभट्टीय' संस्कृतच बोलूं लागलीं?– शक्य नाही! काय दुष्यंताचा सर्वदमन, किंवा उर्वशीचा आयुस् हे एकदम कालिदासीयच भाषा बोलूं लागले?–छट्! काय लहानगे कौरवपांडव एकमेकांच्या कुरापती काढतांना संस्कृतांत भांडले-कळवंडले नसतील?– जरूर! आणि त्या वेळीं त्यांनी व्यासांची संभावित भाषा खासच वापरली नसेल! फार तर त्यांनी 'फुगा' (स्त्री.) हा शब्द वापरला नसेल; 'बयपी' (=बरफी) हा शब्द त्यांना ठाऊक नसेल; पण ह्याच शब्दांचीं त्या वेळचीं दुसरीं छोटीं बोबडीं भावंडे त्यांनी अवश्य

खेळविलीं - वागविलीं असलीं पाहिजेत ! तेव्हा अशा प्रकारच्या संस्कृताचा लोभसवाणा 'बोबलकांदा' नमुना आपल्याला येथे पहावयाला मिळतो[२]. सबंध संस्कृत वाङमयांत 'बोबलकांद्या' संस्कृतांतली एवढीच ही एकुलती एक पद्यरचना असावी.

यामधूनच अद्यकालीन जीवनाच्या संदर्भांतल्या संस्कृत भाषेच्या स्वरूपासंबंधीं एक प्रश्न उत्पन्न होतो. भाषा हें सामाजिक व्यवहाराचे, अर्थात् जीवनाचें, एक अत्यंत महत्त्वाचें अंग आहे, हें उघड आहे. अर्थात् व्यवहारांतल्या वस्तूंचें आणि कल्पनांचें प्रतिबिंब भाषेमध्ये पडणार. व्यवहार आणि भाषा यांत भेद पडून भाषा जर मागेमागे राहूं लागली, तर मात्र भाषा मागासते, टाचकी बनते, आणि मग तिची व्यवहाराला गांठण्यासाठीं फरफट निघते. म्हणून भाषेला व्यवहाराचा संदर्भ नित्य बाळगावा लागतो. प्रायः ती तो बाळगतेहि. परंतु संस्कृत भाषा ही बोलण्याच्या व्यवहारांतून लोपल्या-वर तिचा हा संदर्भ लोपला. ज्याप्रमाणे विज्ञानांचा विकास न झाल्या-कारणाने परिभाषेचा संदर्भ आज मराठीच्या बाबतींत उणावला आहे, त्याप्रमाणें. त्यामुळे संस्कृत भाषा ही अळून राहिली. आता, हें तिचें राहणें नाहीसें करावयाचें असेल, तर प्रथम तिला व्यवहारा-भिमुख बनविलें पाहिजे. त्यासाठी तिला अर्थातच आजच्या व्यव-हारांतल्या कित्येक कल्पना आणि वस्तु यांचे वाचक शब्द उचलावे लागतील; आणि ते आनंदाने, सुखासमाधानाने घ्यावे लागतील. मराठीने असें केलेंहि आहे. टेबल, कोट, बूट, बस, मोटार, टेलिफोन, क्रिकेट, बॅट, बॉल, हॉकी असे शेकडों शब्द आजवर मराठीने घेतले, आणि पचविलेहि. कारण या वस्तुच मुळी नवीन होत्या. मराठीच्या जीवनांत त्या प्रथमच आल्या. संस्कृताच्या जीवनांत तर त्या अगदीच नवीन आहेत. तेव्हा एक तर असे शब्द नवीन तरी बनवावे लागतील,

....

२ संकर-संस्कृताचा (hybrid Sanskrit) असाच मासला आपल्याला बौद्ध वाङमयांत पहावयाला मिळतो, हें वाङमया-भ्यासकांना ठाऊक आहे.

किंवा ते थोडे फिरवून, संस्कारून घ्यावे लागतील; अथवा ते जसेच्या-तसेहि घ्यावे लागतील. खरें पाहतां, संस्कृत भाषेने आपल्या जीवनांत यापूर्वी असें पुष्कळदा केलेलें आहे. तिने भारतांतल्या आदिवासी लोकांचे कांही शब्द घेतले आहेत; ग्रीक भाषेंतून घेतले आहेत; प्राकृत भाषेंतून घेतले आहेत. तण्डुल, कार्पास, पिक, नाटक, मिलिन्द, सुरङ्गा, गङ्गा, दीनार, यवन इत्यादि अनेक शब्द याचे साक्षीदार आहेत. हें सर्व सहज घडलें. इतकें की, आपणां संस्कृतज्ञांना मुद्दाम सांगितल्यावाचून आज त्याची क्वचितच जाणीव होते.

आज तर जीवन कितीतरी पालटलें आहे, आणि झपाट्याने पालटतहि आहे. त्याला अभिमुख व्हावयाचें, आणि त्याच्या संदर्भांत हालचाल करावयाची, तर संस्कृत भाषेला आपला संसार इतर भाषांच्याप्रमाणे ठेवावा लागणें अटळ आहे. हें प्रवाहपतितत्व नव्हे; हें 'स्वभावज कर्म' आहे. मात्र असें करितांना तिचें स्वरूप कोंगाडी होऊं न देण्याची खबरदारीहि घेतली पाहिजे. योग्य तेथे योग्य शब्द आणि कल्पना याचें सावधगिरीने पण मोकळ्या मनाने आणि दिलदारीने ऋण घेतलें पाहिजे, – घ्यावें लागेल. पहा की, तण्डुल, कार्पास या शब्दांनी गीर्वाणवाणीला भात खायला मिळाला, कपडे ल्यायला मिळाले!! आणि 'ऋण' या शब्दाने बिचकून जाण्याचेंहि कारण नाही. कारण भाषिक ऋण हें 'ऋण' नसतें की, ज्याची परतफेड करावी लागावी. तें देणारा देण्याने श्रीमंत ठरत नाही, कारण त्यानेहि कोणाचें तरी घेतलेलें असतेंच; आणि घेणारा घेतल्याने कंगाल होत नाही, कारण त्यानेहि कोणाला तरी दिलेलें असतेंच. ती देण्याघेण्याची घटना दुसऱ्यांच्या घरांतली मुलगी सून करून घेण्याप्रमाणे असते. प्रथम-प्रथम ती जरबेंत वागते. पण मागाहून ती नव्या घरांत एकजीव होऊन जाते, घराचा कब्जा घेते, आणि त्या नव्या घराला, जीवनाला एक संपन्नता आणि शोभा आणिते.

मौज अशी की, मराठीच्या संदर्भांत जी ही गोष्ट आपण सहज मानितों आणि आचरितों, तीच गोष्ट संस्कृत भाषेच्या बाबतींत

नुसत्या बौद्धिक भूमिकेनेहि मान्य करण्याला आपण वाजवीहून जास्त खळखळ करितों. संस्कृत भाषेचा लवचीकपणा, संपन्नता, प्रसव-सामर्थ्य आणि चिवटपणा हे गुण जर इतर भारतीय भाषांना आज-देखील उपकारक ठरले आहेत, आणि ठरत आहेत, तर ती स्वतःच त्या उपकाराला वंचित कां रहावी, तें खरोखर समजत नाही. ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे कल्पवृक्षाच्या तळवटीं एखाद्या करंट्याने आपल्या झोळीला गांठी मारीत बसण्याप्रमाणे हें होतें. भाषेने स्वच्छ रहावें, सावध रहावें, हें कबूल; पण जें शिवतांच ओवळें होतें, असलें सोवळें या देववाणीने कां नेसावें? भारताच्या एवढ्या गुंतागुंतीच्या आधुनिक काळांतल्या राज्यघटनेचेंहि संस्कृतांत आखीव-रेखीव भाषांतर झालेलें आहे, ही घटना त्याच्या सर्वंकष गुणवत्तेच्या दृष्टीने लक्षांत घेतली पाहिजे. म्हणून या बाबतींत देववाणीने 'शनैस्त्वर्यताम्' (Hasten slowly) याचाच अंगिकार करून जपून पण झपाट्याने पावलें टाकणें तिच्या दीर्घकालीन हिताचें ठरणार आहे.

and save your life; this will render my life blessed. Even otherwise, I am sure to die one day'. Thus spake the jackal too, and thus, even others. The innocent camel, out of his regard for the lord, uttered the same words. He alone died; the others survived. How ?

उं टा चा ब ळी

(पंचतंत्रांतली एक गोष्ट : विष्णुशर्म्याच्या काळांतली 'कामराज-योजना'–) मृगराज जखमांनी घायाळ झाले होते; भुकेने कासावीस झाले होते. त्यांना कावळा म्हणाला, 'महाराज, माझा हा देह आज ना उद्या नष्ट होणार हें निश्चित. तो आपण खावा; म्हणजे माझ्या जन्माचें सोनें होईल !' कोल्हा असेंच म्हणाला; बाकीचेहि तसेंच. (ते सर्व जिवंत राहिले.) वेडा उंटहि बिचारा स्वामिभक्तीने तसेंच म्हणाला असता एकटाच मारला गेला, असें कसें झालें ?

□

अ श्व त्थ वृ क्षः

ऊर्ध्वं मूलमधश्च यस्य विततः शाखाः, सुवर्णच्छदः,
कस्योत्कोचतरुर्जगत्यविदितः, यद्यप्यरूपोऽगुणः? ।
छेत्ता कश्चिदुदेति संसृतितरोः, छेत्तास्य वृक्षस्य तु
नाभून्नास्ति न वा भविष्यति पुमान् ! अश्वत्थ एषोऽक्षयः ।।

'ऊर्ध्वमूलमधःशाख...' इत्यादिना संसारवृक्षं विवृण्वती श्रीमती गीता मां क्षमताम् । एतत् पद्यम् उत्कोचनिर्मूलनमन्त्रिणेऽर्पितमस्तु !

The Eternal Tree

Who does not know the huge tree of corruption with its roots upward and branches spreading downward (like the *Samsara* tree in the *Gita*), and having golden leaves, though it has no perceptible form or qualities (also, virtues). It is possible to find one who can chop the tree of *Samsara;* but none who can chop this tree of corruption existed in past, exists today or shall exist in future. This is indeed an eternal tree !

अश्वत्थाचें झाड

ज्याचें मूळ वर आहे, फांद्या खाली पसरल्या आहेत, ज्याचीं पानें सोन्याचीं आहेत, असें लाचलुचपतीचें झाड अदृश्य, निर्गुण-निराकार असलें तरी जगांत कोणाला ठाऊक नाही ? एवढा प्रचंड संसारवृक्ष; पण तोहि तोडणारा कोणी तरी निघतो. हें झाड तोडायला समर्थ असा मनुष्य मात्र मागे झाला नाही, आज नाही, आणि पुढेहि होणार नाही. हा अक्षय अश्वत्थवृक्ष आहे !

□

महातस्कराः

उत्कोचप्रणयी प्रतारणरतश्चौरः स्वकर्मच्युतो
दण्ड्यत्वं यदि याति, यातु पुरुषः, शोको न कोऽप्यत्र नः।
आदायापि धनं वहन्त्यनुदिनं संमृद्य रेल्वोदरे
ये मेषानिव मानुषान्, निगलयेत् कस्तान् महातस्करान् ॥

रेल्वोदरे – रेल्वेवाहनकोष्ठकेषु। एतत् 'एस्. टी.'- संज्ञकवाहनस्यापि उपलक्षणम् ।

BIG THIEVES

We have no tears to shed whatsoever if (and some ifs are insurmountable !) a corrupt man or a swindler or a thief or a shirker incurs punishment. But who will cuff the big thieves who, even after collecting the full fare, transport men every day like sheep by huddling them up in railway carriages ?

म हा चो र

लाचखोर, फसवाफसवी करणारा, चोर, कामांत हलगर्जी, – असल्या माणसाला शिक्षा झाली, तर खुशाल होऊं दे ! आम्हांला त्याचें मुळीच दुःख नाही. पण पूर्ण भाडें वसूल करून-सुद्धा जे रेल्वेच्या डब्यांतून लोकांना मेंढरांसारखें कोंबून त्यांची रोज ने-आण करतात, त्या महाचोरांना बेड्या ठोकील असा कोणी निघेल काय ?

चि त्र गु प्तः

न्यायार्थं भुवि यां श्रयन्ति सरणीं शिष्टा जनाः, नारदात्
श्रुत्वा तां, परमादरेण विषये स्वे चित्रगुप्तः श्रितः ।
' नास्म्येवाहमसौ ' इति प्रतिवचः श्रुत्वा परं पापिनां
स्वे कर्मण्यनुतप्त एष विवशः कूटान् व्यधात् साक्षिणः ॥

CHITRAGUPTA

Chitragupta (the judge of the dead) came to know through *Narada* (the eternal cosmic traveller) of the judicial system followed by civilized people on the earth.

He was very much impressed by it; and he implemented it in his own realm. In the very first case that followed, the sinner proclaimed, 'Your Honour, I am not the accused!' At this blank denial, *Chitragupta* repented. But being helpless, he now started bringing in perjurers too!

चित्रगुप्ताची न्यायसुधारणा

भूलोकांत सुसंस्कृत लोक न्यायदानासाठी जी पद्धत अनुसरतात, ती नारदाच्या तोंडून चित्रगुप्ताने ऐकली. त्याला तिच्याविषयी फारच आदर वाटूं लागला, आणि त्याने ती आपल्याहि राज्यांत सुरू केली. पुढे जेव्हा आरोपी पाप्यांचे 'तो मी नव्हेच,' असे इन्कार त्याच्या कानीं पडूं लागले, तेव्हा मात्र त्याला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. पण आता निरुपाय झाल्याने तो खोटे साक्षीदारहि तयार करूं लागला!

□

मन्त्रितस्करौ

मन्त्री तस्करमाह कोऽपि, 'शठ रे! लोकैः श्रमेणार्जितं
वित्तं भित्तिविभेदनेन हरसे, धिक् त्वां जनद्रोहिणम्!'।
पूर्वं प्राह परः, 'कथं जनधनं त्वं भित्तिभेदाद् विना
गृह्णीषे च, न दण्ड्यसे च?
भगवन्! शिष्योऽस्मि ते, शाधि माम्!'॥

अत्र पूरणिका–'गुरोस्तु मौनं व्याख्यानं, शिष्यः संछिन्नसंशयः।' अथवा, उत्तरः श्लोकः उत्तरं ज्ञेयम्।

A MINISTER AND A THIEF

A certain minister reprimanded a thief: 'You scoundrel! Public enemy! Shame upon you that you rob people of their hard-earned wealth by breaking into their houses!!'

Thereupon the latter appealed to the former: 'Sir! how do you manage to grab people's wealth without breaking into their houses, and escape punishment too? Teach me this, O Master! I am your disciple!!'

मं त्री आ णि चो र

एक मंत्री चोराला म्हणाला, 'लुच्च्या माणसा! लोकांनी निढळाचा घाम गाळून कमावलेला पैसा तूं घरफोडी करून लुटतोस. तूं जनतेचा शत्रु आहेस. थुत् तुझ्या जिण्यावर!'

यावर चोर मंत्र्याला म्हणाला, 'पण काय हो, आपण लोकांचा पैसा घरफोडी न करतांच खिशांत घालतां आणि त्याबद्दल आपणांला शिक्षाहि होत नाही! ही काय विद्या आहे, ती आपण कृपा करून मला शिकवा. गुरुमहाराज, हा चेला आपल्या चरणीं नम्र आहे!!'

□

द ण्ड मु क्तिः

कर्तव्यस्य विलोपनं, शिथिलतां कार्ये, – किमेतावता ?
गेहच्छेदन-वित्तलुण्टन-नरप्राणापहाराद्यपि।
सर्वं कर्तुमलं भविष्यसि, भयं दण्डाच्च न स्यात् तव;
–'हन्त, ब्रूहि कथं ?'–सखे, यदि पदे विभ्राजसे शासितुः॥

चौरं प्रति मन्त्रिणः उक्तिः। पूर्वश्लोकः दृश्यताम्।

Security from Punishment

Neglect of duty, carelessness — nay, even house-breaking, highway robbery and murder : You can afford to do all this and remain secure from punishment.

'Indeed ? Oh, tell me how !'

Well, brother ! if you can only manage to get into the ruler's chair !

शि क्षे ची सू ट

कामचुकारपणा, हलगर्जीपणा, एवढेंच काय तर घरफोडी, दरोडे, खून, – सारें सारें तूं करूं शकशील; आणि वर तुला शिक्षेचेंहि भय उरणार नाही.

'आं ! खरें म्हणतां ? अहो, सांगा तरी यासाठी काय करूं तें !'

यासाठी दोस्त ! एकच कर. राज्यकर्त्याच्या खुर्चीत जाऊन बस. बस् !

□

ऋ ण म्

'जाता एव वयं वहाम इह चेन्मूर्धन्यृणानां त्रयं,
तत् सिद्धः "प्रकृतिर्ऋणानि, विकृतिश्चानृण्य"मित्यागमः।
निःशङ्कं तदृणं वृणीत पुरुषः; प्रत्यर्पणीयं न वा
पुत्रश्चिन्तयिते–'त्यृणं प्रतिपलं गृह्णाति नः शासनम्॥

अत्र 'जायमानो ह वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते' त्यादिश्रुतिः अनुसंधेया।

DEBT

'If, as the *Vedas* declare, we carry the burden of three debts even at birth (viz. to the gods, to the sages and to the forefathers), it has the authority of the scriptures that debts are the norm and no debts the aberration. A man should, therefore, seek debts (loans) without any compunction Whether to pay them back or not, the son will decide !'

It is perhaps with this thought that our government solicits loans every moment.

क र्ज

'आपण जन्माला येतों, तेच मुळी जर "तीन ऋणें" (देवऋण, ऋषिऋण, पितृऋण) डोक्यावर घेऊन येतों, तर मग श्रुतिस्मृतिप्रामाण्यानेच असें ठरतें की, "कर्ज हीच मनुष्यमात्राची प्रकृति आहे, आणि निष्कर्जीपणा ही विकृति !" तेव्हा माणसाने निश्चितपणें कर्ज काढावें. तें परत फेडायचें कीं नाही, तें मुलगा पाहून घेईल !'

बहुधा अशाच विचाराने आमचे राज्यकर्ते क्षणोक्षणीं कर्ज काढीत असतात.

□

म द्य ब्र ह्म

मद्यब्रह्म पुराद्वितीयमभवद् रेमे न तत् केवलं,
तत् 'स्यां बहुवि'ति च 'प्रजाय' इति च
(श्रुत्वा श्रुती-) रैक्षत ।

तत् साधूनसृजद्, विधाप्य च ततस्तैः स्वप्रतिष्टम्भनं व्याप्य द्यां पृथिवीं च तद्धि परमे व्योमन् दशांशु स्थितम् ।।

अत्र यथावसरं ' सदेव सोम्येदमग्र आसीत्, एकमेवाद्वितीयम् ' इत्यादयः श्रुतयः अनुसंधेयाः । प्र ति ष्ट म्भ न म् – नियमनम्, ' प्रोहिबिशन ' । द शां शु स्थि त म् – अत्यतिष्ठद् दशाङ्गुलम् ।

WINE, THE BRAHMAN

Wine, that is the *Brahman*, was alone in the beginning; and it was ill at ease. On going through the *Vedas*, it reflected, ' Let me be many, let me procreate. ' Thereupon, it created saints; and through them, it imposed prohibition on itself. As a result, it pervaded the whole space from heaven to earth, and even exceeded ten per cent to stay in the highest heaven!

म द्य ब्र ह्म

मद्यब्रह्म हें सृष्टिपूर्वकालीं एकटेच होते. त्याला एकटेपणामुळे चैन पडेना. मग त्याने काय केलें ? वेदांची पोथी उघडून पाहून ' मीं पुष्कळ व्हावें, ' ' मीं निपजावें, ' असा संकल्प केला; आणि त्याने साधुसंतांना जन्माला घातलें. त्यांच्याकरवी त्याने स्वतःवर बंदी घालून घेतली; आणि लागलीच त्रिखंडाला व्यापून तें सर्वोच्च अवकाशांत दहा अंगुळें शिल्लकहि राहिलें !

□

रा ज्या य त स्मै न मः

सा हृद्या मदिरा, स शौण्डिकवृषा, सार्थः स मद्यार्थिनां,
पार्श्वे सा विटचेटषण्ढपरिषत्, ताम्बूलतुण्डचश्च ताः ।
ते कण्ठप्रणयाश्च, ते कलकलाः, ता गालयः, ते भ्रमाः, –
सर्वं यस्य वशाद् दशान्तरमगाद् राज्याय तस्मै नमः ॥

विहितमद्यपानप्रतिबन्धं राज्यम् अत्र अधिक्रियते । आद्यचरणत्रयेण प्रतिबन्धात् पूर्वा स्थितिः वर्ण्यते । ता म्बू ल-तु ण्डचः – अर्थात् वेश्याः । द शा न्त र म् – अर्थात् उत्कर्षम्; केवलं रूपान्तरेण । ‘धरान्तरम्’ इत्यपि पाठः । लब्धावसरः भर्तृहरिः ‘टेकचन्द–समितेः’ पुरस्तात् इदमेव अवक्ष्यत् ।

HAIL TO THE STATE !

Hail to the State under the auspices of which (i. e. under prohibition) the following attained a changed (improved ?) condition (also, went underground) : the sweet wine, the great (bull-like ?) wine vendor, the throngs of drunkards, the assemblage of paramours, loafers and eunuchs, the prostitutes, the throwing of arms round the necks (or strangling), the clamour, the abuse and lastly, the swaying and staggering !

त्या रा ज्या स लो टां ग णें

ताडी, तल्लफ, तो कलालहि वळू, तो दारुड्यांचा थवा,
बाजूला हिजडे, तमासगिर ते, त्या थुंकती वेसवा ।

जाती हात गळ्यांत, तो गलबला, त्या तें शिव्या झिंगणें,–
ज्यापायीं भुइलागिं हें मिळत, त्या राज्यास लोटांगणें ॥
(वानरपंडितकृत समश्लोकी)

□

सुवर्णनियमनम्

कश्चिच्चर्छविलको विलोक्य विपुलामट्टालिकां जातुचित्
श्लक्ष्णं भित्तिबिलं चकर्त रजनौ श्रीकार्त्तिकेयं स्मरन् ।
पेटां गर्भवतीं जहार, सुषुवे शुद्धं च सा हाटकं,
क्रेतॄंस्त्वस्तमितान् विचिन्त्य धनिने प्रत्यर्प्य सोऽभूत् सुखी ॥

GOLD CONTROL

Once a thief saw a big palace. At night, he muttered the name of the god of thieves and cut a hole in its wall. Through it, he stole a chest promising rich contents; and it yielded solid gold. But finding the regular customers (goldsmiths) swept off, the thief returned it directly to the owner, and (yet) became happy !

सुवर्णनियंत्रण

एका चोराने एकदा दिवसां एक भव्य हवेली पाहिली. रात्र पडल्यावर त्याने खंडोबाचें नांव घेऊन त्या हवेलीच्या भिंतीवर कुदळ घालून एक झकास भोक पाडलें. त्यांतून आंत शिरून त्याने एक 'पोटुशीं असलेली' पेटी पळवली; आणि ती बावनकशी सोनें व्याली ! तेव्हा त्या चोराने सोन्याला

गिऱ्हाइकें शोधण्यास सुरवात केली. पण आता अशा सोन्याचे नेहमीचे खरेदीदार देशोधडीला लागलेले पाहून त्याने ती पेटी सरळ तिच्या मालकालाच परत केली; आणि तो चैनींत राहूं लागला !

□

रा ष्ट्रि यी क र ण म्

भिक्षायां विनियुज्य कश्चन वणिग् भृत्या सहस्रं जनान्
कोटीशत्वमवाप; भिक्षणमभूद् द्राग् राष्ट्रियीकारितम् ।
कोटीशोऽप्यथ वृत्तिनिष्कृतिमिषाल्लेभे धनं कोटिशः
भिक्षेशत्वमगाच्च शासनपदं, लक्षेशतां भिक्षुकः ।।

रा ष्ट्रि यी का रि त म् – नॅशनलाइझ्ड् अर्थात् शासनेन । वृ त्ति नि ष्कृ तिः – कम्पेन्सेशन । भि क्षे श त्व म गा च्च शा स न प द म् – वृत्तिनिष्कृतौ कृतात् व्ययात् । ल क्षे श तां भि क्षु कः (अगात्) – लाभस्य अविभाज्यत्वात्, अदेयत्वात् च । भिक्षुकस्यैव हि राष्ट्रत्वात्, यत् राष्ट्रियं तत् भिक्षुकस्यैव स्वम् अभूत् ।


NATIONALISATION

A businessman once employed a thousand men to beg (for him) on remuneration; and soon he became a multi-millionaire. Consequently, begging was nationalised. The businessman, (already a multi-millionaire,) earned many more millions by way of compensation; the government, in paying the compensation, became bankrupt; and after the industry was nationalised, the beggars became millionaires.

रा ष्ट्रि यी क र ण

एका व्यापाऱ्याने पगार देऊन हजार लोक भीक मागण्यास नेमले, आणि तो कोट्यधीश झाला. लागलीच भीक या धंद्याचें राष्ट्रियीकरण झालें. तेव्हा व्यवसायाची भरपाई म्हणून कोट्यधीशाला कोट्यवधीची प्राप्ति झाली; भरपाई देतां-देतां सरकार भिक्षापति झालें; आणि भिक्षापति लक्षाधीश झाले !

□



नि ष्प्रे ष ण म्

'आम्राणि क्व गतानि ?' अमेरिकभुवं;
'काजूगराः ?' क्वान्यतः ?
'दुर्दर्शं कदलीफलं !' तदखिलं रूसाय
निष्प्रेषितम् ।
'पेयेऽस्त्यद्य न शर्करा !' न विदितं ?
साद्य प्रयाता दिवं !
तन्नोऽपि प्रहिणोतु शासनपदं यत्रास्ति
सर्वं गतम् ।।

नि ष्प्रे ष ण म् – एक्स्पोर्ट । अपि नाम मानुषैरपि निष्प्रेषितैः 'डॉलराः' लभ्येरन् !

EXPORT

'Where have the mangoes gone ?' – To America. 'Cashew nuts ?' – Where else ? 'The plantains have become rare to the

sight !' – Well, they have all been exported to Russia. 'There is no sugar in the tea today !' – Don't you know ? It went to heaven this very day !

Will the government kindly export *us* too to where all this has gone ?

नि र्या त

'आंबे सगळे कुठे गेले ?' – अमेरिकेंत. 'आणि काजू ?'– आणखी कुठे जाणार ? 'आता केळींहि दिसेनाशीं झालीं ?' – होणारच; तीं सगळीं रशियाला पाठवलीं ना ! 'आज चहांत साखर नाहीं ?' – काय, माहीत नाही ? आजच तिची स्वर्गाकडे निर्यात झाली !

आता प्रश्न एकच की, या सगळ्या वस्तू जिकडे गेल्या आहेत, तिकडे आमचीहि निर्यात सरकार कां करीत नाही ?

□

'पा ता ल वा णी – पा प के न्द्र म्'

कृष्णोऽप्यद्य शुचिश्रवाः ! विजयते कृष्णापि (कृत्या सती)
चाणक्यो नयवित्तमः ! शिव शिव ! ! श्रीचन्द्रगुप्तो महान् !
लक्ष्मीच्छत्रपतिप्रताप ... धिगहो ! भद्राः किलैते (खलाः) !
दुःश्राव्यं क्व नु पापकेन्द्रमुदितं पातालवाण्या इदम् ? ॥

यत्र कृष्णादयोऽपि पाप्मानः सुगृहीतनामानः उद्घोष्यन्ते, तत् किं भारतशासनस्य 'आकाशवाणी-पुण्यकेन्द्रं' भवितुमर्हति ? कृष्णादीनां दूषणे हि अस्माकं राष्ट्रियत्वं प्रतिष्ठितम् ! कृ ष्णा – द्रौपदी । ल क्ष्मीः – झांसीस्वामिनी । छ त्र प तिः – शिवाजिः । प्र ता पः – राणाप्रतापः ।

PATALAVANI — PAPAKENDRA

Krishna too is being acknowledged today as of clean reputation ! *Krishna* i. e. *Draupadi* (who in fact is a destructive devil) is being hailed ! *Chanakya* is declared as the greatest diplomat ! Oh God, *Chandragupta* is treated as great ! *Laxmi* (of Jhansi), *Chhatrapati* (Shivaji), (Rana) *Pratap* – O fie ! these rascals have become honourable !

Whence has this unbearable-to-the-ear 'Sin Station' of the 'Voice of Hell' cropped up ?

पा ता ल वा णी – पा प कें द्र

आज तो (चांडाळ, युद्धखोर) कृष्णसुद्धा धवल कीर्तीचा ठरला आहे ! द्रौपदी – ती कृत्या, तिचा जयजयकार चालला आहे ! चाणक्य हा थोर मुत्सद्दी ! हर हर ! ! आणि श्रीचंद्रगुप्त – श्री ! – हा महान् ! (झाशीची) लक्ष्मीबाई, छत्रपति (शिवाजी), (राणा) प्रताप, ... अरे अरे अरे ! सगळे हरामखोर भलावणी खाऊं लागलेत !

ऐकवत नाही अगदी ! देवा, हें 'पातालवाणी'चे 'पापकेंद्र' उपटलें आहे तरी कुठून ?

□

ग्र न्थ प्र का श न म्

ग्रन्था हि द्विविधाः – प्रकाशकधनं ये वर्धयन्त्यक्षयं,
कार्श्यं ये च नयन्ति; ते हि विदिताः पाठ्यादिशास्त्रादयः।
वृद्ध्यै चेत् किल यः, प्रकाशनकृतः; लोकस्य, कार्श्याय चेत्;

तादृग्ग्रन्थमणिप्रकाशनविधेर्ज्ञाः केवलं शासकाः ॥

अन्येषां प्रकाशकानां पाठ्यादयो ग्रन्थाः श्रियो वृद्ध्यै भवन्ति, शास्त्रादयश्च तस्याः क्षयाय। बहुलाः हि पाठ्यादीनां क्रेतारः विरलाश्च शास्त्रादीनाम्। शासकैः तु प्रकाशिताः ग्रन्थाः बहुलविक्रयाश्चेत् शासकानां यशोवृद्धिद्वारेण वृद्धये भवन्ति; विरलविक्रयाश्चेत् जनदत्तकरद्रव्यनिधिकर्शनद्वारा जनानां हान्यै भवन्ति। प्र का श न कृ तः – प्रकाशकस्य।

PUBLICATION OF BOOKS

Books are of two kinds : those which constantly increase the publisher's money and those which reduce it. These are acknowledged to be text books and the *Shastric* works respectively. There are books of a third kind of which, if they are a success, the profit is credited to the publisher's account; if they fail, the loss is debited to the people's account. Government alone knows the art of publishing such books !

पु स्त कां चें प्र का श न

पुस्तकें दोन प्रकारचीं असतात. जीं प्रकाशकांचें धन निरंतर वाढीला लावतात तीं, म्हणजे पाठ्य पुस्तकें; आणि प्रकाशकांच्या धनांत खोट आणतात तीं, म्हणजे शास्त्रग्रंथ. पण ज्याने फायदा झाला तर प्रकाशकाचा होतो, आणि तोटा झाला तर लोकांचा होतो, असल्या तिसऱ्या प्रकारच्या ग्रंथरत्नाचें प्रकाशन करण्याची विद्या कुणाला अवगत असेल, तर ती केवळ सरकारलाच !

□



वि द्यु द्दी पः

स्वाध्यायादि हि यत् त्वया व्यवसितं ‘रात्रौ विदध्या’ मिति,
तद् धीमन् ! दिवसेन साधयसि चेद् बाढं, हतोऽस्यन्यथा ।
पण्यस्त्रीव पुरेऽटतीह चपला, कोऽस्यां बत प्रत्ययः !
दिष्ट्याद्यापि रविप्रभावितरणं राज्येन न स्वीकृतम् ॥

दि ष्ट्या द्या पि...– अन्यथा दिवा कार्यं कुर्वतोऽपि नक्तमिव सहसा अन्धकारोदयेन विघ्नः स्यात्। किंतु ‘स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डः’ इव कश्चन ‘स्टेट सन्लाईट बोर्डः’ कथं नाद्यापि उदितः, ति बलवत् विस्मयते नः चेतः ।

The Electric Light

O wise man! if you finish by day whatever reading and study you propose to do at night, that is all right; otherwise, you are doomed! For, in this city (of Poona), Electricity jilts like a prostitute; who will trust her ? We must consider ourselves lucky in that the State has not as yet set up a Board and monopolized the distribution of even sunshine !

वि जे चा दि वा

शहाण्या माणसा ! जें कांहीं लिहिणें-वाचणें वगैरे ‘रात्री करीन,’ म्हणून तूं ठरवलें असशील, तें दिवसांच संपवलेंस तर ठीक आहे. नाहीतर तूं मेलास ! अरे, या गांवांत वीज बाजारबसवीसारखी उंडारत असते. तिचा काय भरवसा ? हें तरी मोठें नशीबच की, अजून सूर्याचेहि चरण (किरण, तंगड्या) राज्यकर्त्यांच्या हातीं गेलेले नाहीत !

□

न ग्न मा हा त्म्य म्

नानग्नाः प्रभवन्ति गन्तुमपुनर्जन्माभिधं तत् पदं,
नग्नेभ्यो दरतीश्वरोऽपि हि, महन्नग्नाद् भयं शासितुः ।
नग्नेनैव विमोचिता भरतभूः, देवोऽपि नग्नो महान्,
नानग्नस्य शृणोति कोऽपि वचनं, तद् भद्र ! नग्नो भव ॥

अ न ग्नाः – अनुत्खण्डितसंसारावग्रहाः । अ पु न र्ज न्म – मोक्षः । दे वो ऽ पि न ग्नो म हा न् – महादेवः, यस्य नग्नत्वं ‘दिगम्बरत्वेन निवेदितं वसु’ इत्यादिभ्यः अभियुक्तोक्तिभ्यः सिद्धम् ।

Power of Nakedness

Those who are not naked (i. e. shorn of all worldly ties) cannot attain emancipation that wards off rebirth. God fears the naked; and even rulers are greatly afraid of them. It was a naked man who freed this land of *Bharata* from foreign rule. Even among gods, he who is naked (*Shiva*) is acknowledged to be the greatest (*Mahadeva*). No one cares for the pleas of one who is not naked.

Therefore, O good man ! be naked !!

नंगा हो !

जे नंगे होत नाहीत, ते मोक्षाला जाऊं शकत नाहीत. नंग्याला खुदाहि डरतो, आणि राज्यकर्त्यालाहि खरें भय नंग्याचेंच वाटतें. या भारताला मुक्त केलें, तें एका नंग्या फकिरानेच. देवांमध्येहि जो नंगा, तोच महा-देव ठरला. जो नंगा नाही, त्याचें म्हणणें कोणीहि ऐकून घेत नाही. तेव्हा गड्या, तूंहि नंगा हो !

□

प ङ्क्ति प्र प ञ्चः

क्रेतुं व्रीहियवं यदीच्छथ ततः पङ्क्ताविह स्थीयताम्,
पङ्क्तिस्तैलजलार्थमत्र रचिता, सा शर्करार्थं स्थिता ।
अत्रैषा करदायिनाम्, अपरतो भृत्यर्थिनां तायते, –
राज्ये मृत्युविवर्जमत्र सकलं पङ्क्तिप्रपञ्चे स्थितम् ॥

प ङ्क्तिः – क्यू (Queue) । तै ल म् – केरोसीन । भृ तिः – वेतनम्, उद्योगः ।

THE REIGN OF THE QUEUE

If you want to purchase rice and wheat, stand in this queue. This queue is for water, this for kerosene, and that for sugar. Here is a queue for the tax payers, and on that side, one for those seeking employment. In fine, all but death in this State is controlled by the ubiquitous queue !

रांग ! रांग !

तुम्हांला तांदूळबिदूळ घ्यायचे असतील, तर या रांगेंत उभे रहा. ही रांग रॉकेलसाठी, आणि ती तिकडे साखरेसाठी. इथे कर देणाऱ्यांची रांग लागली आहे; दुसरीकडे रोजगार मागणाऱ्यांची रांग लांबली आहे. या राज्यांत मरणाखेरीज सगळ्या गोष्टींसाठी रांग लावावी लागते !

□

३. पञ्चशीलपद्धतिः

THE WAY OF THE PANCHASHEEL

प ञ्च शी ल प्र क र ण

स्व रा ज्य म्

कर्षेद् यः स भुवः पतिः, गृहपतिर्योऽधिष्ठितः केतनं,
क्रीडेद् यः स पथः पतिः, तरुपतिः शक्तोऽश्मनां क्षेपणे ।
खादेद् यः स पतिर्धनस्य च, हरेद् योऽसौ पशूनां पतिः,
धर्षेद् यः स पतिः स्त्रियो यदिह तत् पूर्णं स्वराज्यं विदुः ॥

SELF-GOVERNMENT


He who tills, is the owner of the land; he who dwells, of the house; he who plays, of the street; he who can fling stones, of the tree; he who eats, of money; he who lifts, of the cattle; he who rapes, of the woman.

This is conceived to be full-fledged self-government !

स्व रा ज्य

कसेल त्याची जमीन, राहील त्याचें घर, खेळेल त्याचा रस्ता, दगड मारील त्याचें झाड, खाईल त्याचा पैसा, पळवील त्याचीं गुरें, भ्रष्टवील त्याची स्त्री,– हें सर्व म्हणजे परिपूर्ण स्वराज्य होय !

□



वृ क्षा रो प ण म्

'रोप्यन्तां तरवो गृहे गृहे' इति श्रुत्वा वचो मन्त्रिणाम्
अस्माभिर्गृहसंनिधौ प्रणिहितो जात्यो रसालस्तरुः ।
कालेनाभवदास्पदं (सह शिलाखण्डैः) फलानामसौ
लोकास्तस्य फलं (शिलामपि वयं) भुक्त्वा गता निर्वृतिम् ॥

Tree Growing

'Grow trees in every house,' – at this message of our ministers, we planted near our house a mango sapling of an excellent variety. In due time, it bore fruit and soon became a target of stones. Finally, both the people and we got satisfied, – the people on consuming the fruit, and we on 'consuming' the stones.

झाडें लावा !

'घरोघरीं झाडें लावा !' असा पूज्य मंत्र्यांनी संदेश दिलेला ऐकून आम्हीं आमच्या घराजवळ एक जातिवंत कलमी आंब्याचें रोप लावलें. कांही दिवस गेल्यावर त्याला फळें लागलीं; दगडहि लागूं लागले. शेवटीं त्यांचीं फळें खाऊन लोक, आणि दगड खाऊन आम्ही असे दोघेहि तृप्त झालों !

□

आयव्ययौ

लभ्यं रूप्यशतं नृणां परिमितं, भोज्ये तदर्धं गतम्,
पादो वासगृहेश्वराय च, भिषग्वह्नौ च पादो हुतः ।
भिक्षाशिक्षणदेशरक्षणविमागुण्डाग्रणीतर्पणं
शेषार्थैर्यदि साधनीयम्, अपरा चौर्यादितः का गतिः ?।।

'आयुर्वर्षशतं नृणां परिमितम्' इत्यादि अनुपमं पद्यं विरचयन् तत्रभवान् भर्तृहरिः इदं मे विडम्बनदुर्ललितं क्षमताम् । गुण्डाश्च, (लोकानाम्) अग्रण्यश्च इति द्वन्द्वः । विमा – इन्शुअरन्स । 'तर्पण'शब्दः भिक्षादिभिः प्रत्येकम् अभिसंबध्यते ।

INCOME AND EXPENDITURE

The common man earns the limited sum of a hundred rupees. Of this amount, half is spent in foodstuffs; a quarter goes as rent to the landlord; and a quarter is to be offered into the fire known as the physician. Now, if out of the balance (?) are to be fed items like beggars, education, defence fund, insurance, goondas and leaders, what is the way out but to resort to means like theft ?

जमाखर्च

माणसाला मुळांत मिळायचे मोजके शंभर रुपये. त्यांतले निम्मे खाण्यापिण्यांत गेले; पाव हिस्सा घरमालकाला, भाडें म्हणून; आणि पाव हिस्सा औषधासाठी, डॉक्टराला आहुति ! आता शिल्लक राहिलेल्या (?) रकमेंतून जर भिकारी, शिक्षण, संरक्षणनिधि, विमा, गुंड, पुढारी (-लोकांचा सत्कार) इतकें सगळें भागवायचें, तर चोरी करण्यावाचून मार्ग तरी कोणता आहे ?

□

चन्द्रस्य कालिमा

नक्तं यो धवलेन्दुमण्डलगतः संलक्ष्यते कालिमा,
तं पङ्कं शशकं घनान्धतमसं मूढाः समाचक्षते ।
एतन्मन्त्रिवणिग्जनैः सुकृतिभिश्चन्द्रस्य लोकं गतैः
साकं नीतमिहार्जितं भुवि पुरा कृष्णं धनं मन्महे ।।

'अङ्कं केऽपि शशङ्किरे' इत्यादि पद्यम् अनुसंधेयम् । 'साकं नीतम्' – कथम् ? यथा 'शेषैः पुण्यैर्हृतमिव दिवः कान्तिमत् खण्डमेकम्' ।

Spots on the Moon

At night, dark spots are observed on the bright face of the full moon. Some fools fancy them to be the mud of the sea (from which the moon is believed to have sprung), or a hare, or the pitch darkness the moon gulps down during the night. We, however, think that this is the black money the pious ministers and merchants earn while on earth, and carry with them when they depart to the heavenly abode of the moon !

चंद्राचा काळिमा

शुभ्र चंद्रबिंबावर रात्रीं जे काळे डाग दिसतात, त्यांना खुळचट लोक (समुद्रांतला) चिखल म्हणतात, ससा मानतात, (रात्रीं चंद्राने गिळलेला) मिट्ट अंधार समजतात. आमचें असें मत आहे की, पुण्यशील मंत्री आणि व्यापारी जेव्हा चंद्रलोकाला जातात, तेव्हा भूलोकांत असतांना कमावून त्यांनी आपल्या बरोबर नेलेला हा काळा पैसा आहे !

□

गुण्डस्य कस्माद् भयम् ?

मन्त्री राष्ट्रसभा च यस्य पितरौ, आरक्षका भ्रातरः,
कारासौ भगिनी, सुरा च गृहिणी, लक्ष्मीः शुभाङ्गी सुता ।
न्यायेशः श्वशुरश्च यस्य, विधिविच्छ्यालः, कुठारः सखा,
तस्यास्यामवनौ – नहि, त्रिभुवने –गुण्डस्य कस्माद् भयम्?

विधिवित् – प्लीडर ।

WHO CAN SCARE THE GOONDA ?

Who on the earth — nay, in the whole universe — can scare the goonda, of whom the minister and the Congress are the parents; the police, the brother; the jail, the sister; wine, the wife; wealth, the beautiful daughter; the judge, the father-in-law; the pleader, the brother-in-law; and the axe, the faithful companion ?

गुंडाला भय कुणाचें ?

राष्ट्रसभा आणि मंत्री हे ज्याचे आईबाप, पोलीस हे भाऊ, कारा (= तुरुंग) ही बहीण, सुरा (= दारू) ही बायको,

लक्ष्मी (= संपत्ति) ही देखणी मुलगी, न्यायाधीश सासरा, वकील मेव्हणा, कुऱ्हाड दोस्त, त्या गुंडाला या भूलोकांत – नव्हे, त्रैलोक्यांत – भय कुणाचें ?

□

पक्षप्रभावः

चौरा मानुषघातिनः शठविटाः कृष्णापणश्रीधराः
अस्मत्पक्षवशंवदा यदि, ततः सर्वेऽपराधाश्च्युताः ।
ये पक्षान्तरपक्षपातरतयः, – सन्तोऽप्यलं सन्तु ते,
निर्भुक्ताखिलबन्दयोऽपि यदि वा, – क्लिश्यन्तु कारासु ते ।।

PARTY

Thieves, murderers, rogues, voluptuaries, black-marketers, — if they accept being ruled by our party, they will be acquitted of all offences. As to those who are inclined to other parties, they shall drudge in jail even if they are saints or have completed their sentence of imprisonment.

पक्षाचा पुण्यप्रभाव

चोर, खुनी, लांड्यालबाड्या करणारे, काळा बाजार करून कमावलेली दौलत मिरविणारे, – कोणी असोत, ते आमच्या पक्षाचे पाईक असतील, तर त्यांना सगळे गुन्हे माफ आहेत. पण जे दुसऱ्या पक्षांचे कैवारी असतील, ते साधु-संत का असेनात, पडूं देत तुरुंगांत खितपत ! शिक्षेची मुदत भरली तरी तिथेच कुजूं देत !

□

सद्गुरुः

नेपथ्यं दधदुल्बणं जपति यो मन्त्राक्षराण्यस्फुटं,
धृत्वा च स्वकरे मृदादि कुरुते पुष्पादि यस्तत्क्षणम् ।
संज्ञाने विवशीकरोत्यपि जनान्, गृह्णाति तेभ्यो धनं,
सोऽयं 'सद्गुरु'रुच्यते यदि, ततो मायीति कः शिष्यते ?।।

THE GREAT MASTER

If a man who is splendidly attired, mutters spells, takes in his hand things like earth and, in a moment, turns them into things like flowers, benumbs the senses of the people, accepts money from them, is to be called a *Sad-guru*, a great master, then who is to be called a magician ?

सद्गुरु

भपकेबाज पेहराव करून जो मंत्र पुटपुटतो, हातांत मातीबिती घेऊन क्षणांत तिचीं फुलेंबिलें करून दाखवतो; लोकांची शुद्ध हरपवतो, आणि त्यांच्याकडून सोनेनाणेंहि घेतो, असल्याला जर 'सद्गुरु' म्हणावयाचें असेल, तर 'जादुगार' म्हणून कोण उरेल ?

□

कृतज्ञता

जामात्रापहृतं गृहं नयविदा, वृत्तिर्हृता वत्सया,
नित्यं तद्वदनारविन्दयुगलाद् गालीमधु स्यन्दते ।
क्रोशन्तीं विधवां सुताह, 'जरठे ! सर्वं ममेदं पितुः ;
'रण्डे !' तत्पतिराह, 'याहि निरयं'; वृद्धा विधिं निन्दति।।

GRATEFULNESS

The son-in-law, deep drunk in law, robbed the old woman of her house; the daughter deprived her of her pension. Honey-sweet abuse constantly flows from the lotus-faced two. When the poor old widow moans, the affectionate daughter reproaches her, 'You old fool! all this belongs to my father.' And her husband compliments her, 'You devil of a widow! go to hell!!'

The old woman only blames her fate.

कृ त ज्ञ ता

जावईबुवा मोठे कायदेपंडित. त्यांनी म्हातारीचें घर घशांत घातलें; प्रेमळ लेकीने म्हातारीची पोटगी पोटांत घेतली. दोघांच्याहि मुखकमलामधून शिव्यांचा मध सदैव पाझरत आहे! बिचारी विधवा म्हातारी तडफडूं लागली की लेक म्हणते, 'थेरडे? कां ओरडतीस? हें सगळें माझ्या बापाचें आहे. तुझें काय आहे!' आणि लेकीचा नवरा म्हणतो, 'रंडकी मरत कां नाही एकदाची!'

आणि म्हातारी नशिबाला बोल लावते.

□

प रो प का री

उत्कोच्येन लघूकृतो धनभरः कार्यार्थिनां प्राक् त्वया,
हृत्वार्थं स्वजनोऽपि वर्तनभरात् सद्यस्त्वया मोचितः ।
स त्वं पापभरं भुवो लघयितुं लोकोपकारव्रत !
'व्याख्यानैर्ग्रंथनैरसि व्यवसितो दण्डैश्च, तुभ्यं नमः !॥

The Benevolent

Being bribeable, you formerly relieved the litigants of the burden of money. By snatching allowances, you relieved your relatives too of their burden of sustenance. Now to relieve the earth of its burden of sins, O avowed benefactor of mankind! you have devoted yourself to sermons, articles and fines and punishments. We bow to you!

परोपकार

पूर्वी आपण लोकांचीं कामें करून देण्यासाठी लाच घेऊन त्यांचा पैशाचा भार हलका केला. पुढे आपल्याच नातेवाइकांच्या धनाचा अपहार करून त्यांचा उपजीविकेचा भार हलका केला. आता आपण पृथ्वीचा पापाचा भार हलका करण्यासाठी व्याख्यानें, लेख, पुस्तकें आणि दंड-खटले यांच्यासह सिद्ध झालां आहां. एकूण लोकांवर उपकार हेंच आपलें जन्माचें ब्रीद. अहो ब्रीदवंत, आपल्याला वंदन असो!

□

काकः

अच्छाच्छैर्वसनै रतो नरवपुस्त्वं कृष्णकृत्येष्वभूः,
कृत्वा धर्मकथां त्वया श्रुतिसुखां लोकाश्चिरं वञ्चिताः ।
आच्छिन्नाः कियताञ्चिदन्नकवला नूनं मुखेभ्यस्त्वया, –
तत् कृष्णश्च कटुस्वनश्च बलिभुग् धात्रासि काकः कृतः ।।

The Crow

Clad in snow-white clothes, you, in your former life as a human being, indulged in

black practices. With sweet-sounding words of piety flowing from your mouth, you cheated people for a long time. You surely snatched morsels of food from many a mouth. It is for these your misdeeds that Fate has made you a crow, — black in colour, harsh of voice, and feeding on others' charity.

का व ळा

पूर्वी तूं मनुष्यदेहधारी होतास, तेव्हा शुभ्रधवल कपडे पेहरून तूं कृष्णकृत्यांचे डोंगर उभे केलेस. धर्माच्या गोड गोष्टी बोलून तूं लोकांची निरंतर फसवणूक केलीस. कित्येकांच्या तोंडचा घासहि तूं छिनून घेतलास. हें सगळें लक्षांत घेऊनच आता तुला ब्रह्मदेवाने कावळा केला आहे, – रंगाने काळा, आवाजाने करडा, आणि लोकांनी दयाबुद्धीने टाकलेल्या बळीवर जगणारा !

□

श्रा द्ध म्

नेता कोऽपि जनप्रियः स्वरगमच्छान्तेर्महान् पूजकः;
शान्ति विन्दतु सोऽक्षयामिति जनैः शोकाकुलैः किं कृतम् ?
हृत्वाहारगृहाच्चहादि सकलं पर्यासितं वर्त्मनि,
लुप्ताः पण्यपथाः, परस्य शकटाः स्वाहाग्नये कल्पिताः ॥

स्वः – स्वर्गम् । आ हा र गृ ह म् – रेस्टॉरण्ट । लुप्ताः – लुण्टिताः ।

The Funeral Rite

A popular leader who was a great devotee of peace departed. What did then the grief-stricken people do in order that he may attain eternal peace? They lifted tea and other things from the restaurants and threw them on to street; looted shops; and set on fire some carts !

श्राद्ध

शांततेचा थोर पुजारी असा एक लोकप्रिय पुढारी स्वर्गवासी झाला. त्याला चिरंतन सद्गति मिळावी, म्हणून त्याच्या शोकाकुल अनुयायांनी काय केलें ? हॉटेलांतलीं चहाचीं वगैरे पातेलीं आणून रस्त्यावर उपडीं केलीं; उघडीं असलेलीं दुकानें लुटलीं; आणि लोकांच्या मालकीच्या गवताच्या गाड्यांना आग लावली !

□

४. धर्मातीतपद्धतिः

THE WAY OF SECULARISM

निधर्मी प्रकरण

लक्षणसंग्रहः

आयुर्वेदभिषक् स, योऽर्जति धनं प्रातीच्यकैर्भेषजैः;
सोऽभिज्ञः खलु संस्कृतस्य, कुशलो यो वक्तुमाङ्गल्या गिरा।
आचष्टे घटितं न वृत्तमपि यत्, तद् वृत्तपत्रं स्थितम्;
ये द्रुह्यन्ति च भारताय सततं, ते भारते राष्ट्रियाः ॥

प्रातीच्यकैः – ॲलोपाथीविहितैः सूचीभरणाद्यैः (Injection)। वृत्तमपि घटितं नाचष्टे, न वृत्तमपि घटितमाचष्टे, इत्युभयथा।

DEFINITIONS

Ayurvedic physicians : those who earn money by using allopathic medicines.

Sanskrit scholar : he who can speak English fluently.

Newspaper : which publishes news even of incidents that have not happened; also, which does not publish news even of incidents that have happened.

Nationals in India : those who hate India forever.

कांही लक्षणें

आयुर्वेदाचा पदवीधर वैद्य : जो लोकांना ॲलोपाथीचीं औषधें देऊन कमाई करतो तो.

संस्कृताचा पंडित : जो इंग्रजींत सफाईदार बोलतो तो.

वृत्तपत्र : जें घडलेल्याहि घटनेची बातमी देत नाही, आणि न घडलेल्याहि घटनेची बातमी देतें तें.

भारतांतले राष्ट्रीय लोक : जें भारताचा निरंतर द्रोह करतात ते.

□

प्रार्थना

कार्या चेन्मयि देवदेव ! करुणा, मा दा धनं, मा गृहं,
मा भार्यां सह सौख्यसाधनशतैः, मोच्चैः पदं, मा भुवम् ।
मुस्लीमं कुरु केवलं पशुपते ! मां भारते, यद्वशात्
अन्येषां प्रसभं हरेय सकलं, रक्षेच्च मां शासनम् ।।

Prayer

O God of gods ! if you want to bless me with your grace, give me no wealth, no house, no wife, no means of pleasure, no high position, no land ! O Lord of crea-

tures (also, beasts), let me only be born as a Muslim, — but in India; so that I can snatch all this from others, and the government would protect me !

प्रा र्थ ना

देवाधिदेवा ! माझ्यावर कृपा करणार असशील, तर मला पैसा देऊं नको, घर नको, बायको नको, शेकडो सुखसाधनें नकोत, उच्च पद नको, भूमि नको ! हे पशुपति, तूं मला नुसतें मुसलमान कर, – मात्र भारतांत, की हें सगळें मी लोकांचें छिनून घेईन. कांही आफत आली, तर सरकार आहेच की मला पाठीशीं घालायला !

□

वि षं भु ङ्क्ष्व

मुस्लीमो यदि नासि, नासि यदि वा तस्य प्रगल्भः स्तुतौ,
मुस्लीमश्वशुरोऽथवा, तदितरान् हन्ताथवा नासि चेत् ।
तत् त्वं भुङ्क्ष्व विषं, न चेद् भरतभूस्वाराज्यसच्छासनं
राष्ट्रद्रोहिषु तीक्ष्णदण्डमचिराच्छीर्षं तव च्छेत्स्यति ॥

DRINK POISON

If you are not yourself a Muslim, nor one eloquent in praising him, nor a Muslim's father-in-law, nor one who has killed non-Muslims, then you will do well to drink poison. If you do not, the good free government of this land of *Bharata*, which is strict and severe in punishing traitors to the nation, will soon cut off your head !

विषखा !

तूं जर मुसलमान नसशील, किंवा त्याचा स्तुतिपाठक नसशील, किंवा मुसलमानाचा सासरा नसशील, किंवा मुस्लिमेतरांचा संहारकर्ताहि नसशील, तर बाबा रे ! तूं ताबडतोब विष खाऊन मोकळा हो ! नाहीतर स्वतंत्र भारताचें हें लोककल्याणकारी सरकार राष्ट्रद्रोह्यांना कडक शिक्षा करण्याच्या ब्रीदाला जागून लवकरच तुझं डोकें उडवल्यावाचून राहणार नाही !

□

दुर्ललितः सुतः

'भुञ्जाने मयि कुत्रचिद् वितनुते पुंस्कोकिलः कूजितं,
ध्वाङक्षो ध्वाङक्षति, बुक्कति श्वपरिषद्, हुम्बायते गोवृषः।
हेषन्ते तुरगाः, मनश्चलति मे,'– श्रुत्वेति पुत्रोदितं
राजा दण्डपतिं समादिशति, 'भोः, सर्वानिमान् घातय !'॥

उक्तं हि कौटिल्येन – 'नात्मप्रियं हितं राज्ञः, प्रजानां तु प्रियं हितम्' इति। अत्र 'प्रजा'पदं पुत्रपरम्।

Spoiled Child

'As I sit down to lunch, the cuckoo calls nearby, the crow caws, dogs bark, a bull bellows, horses neigh, — and this disturbs me.' Hearing these words of his son, the king gave orders to the commander-in-chief : 'Kill them all !'

लाडावलेलां लेक

'मी खायला बसलों, की कुठे तरी कोकीळ केंकाटतो, कावळा कोकलतो, कुत्रें भुंकतें, बैल डुरकतो, घोडें खिकाळतें,

— आणि मग खाण्यांत माझें मन लागत नाही !' लेकाचें हें गाऱ्हाणें ऐकतांच राजाने सेनापतीला फर्मावलें, 'जा ! या सगळयांना गोळ्या घाल !'

□

न न्द न न्द नः

भित्तीर्भिन्द्धि, मुषाण चार्थनिचयं, वृक्षान् समुत्पाटय,
वक्षः कृन्त च दुग्धदस्य, जहि वा स्वैरं गवाश्वादिकम् ।
योषा दूषय, वस्त्रजातमभयं गोपाङ्गनानां हर,
राज्ञस्त्वं ननु नन्दनन्दन ! सुतः, कस्त्वां निरोद्धुं क्षमः! ॥

अत्र 'नन्दराज्यम्' इतिसंज्ञकं प्रागुक्तं पद्यम् अनुसंधीयताम् ।

Son of the King

Break into houses, steal goods, uproot trees, tear the bosom that feeds you, kill bulls and horses at will, pollute women, boldly snatch clothes of milkmaids ! O son of *Nanda* ! you are the king's son. Who dare stop you ?

नं दा चा पो र

घरें फोड, वस्तू चोर, झाडें पाड, दूध पाजील त्याचें छाताड फाड, बैल-घोडे मार, बायका बाटव, गोपींच्या वस्त्रांना निःशंक हात घाल ! हे नंदनंदना, राजाचा लेक तूं; तुला रोखण्याची आहे कोणाला हिंमत !

□

कोटचधीशाः

उद्भिज्जा जलजन्तवः खगमृगा भूताः पिशाचा नराः
पाषाणाश्च सरीसृपाश्च गमिता यैः पारमेशं पदम् ।
तेषां नः सुरकोटचधीशयशसां क्रीडा न किं केवलम्
'अल्ला, ख्रिस्त' इति द्वये यदधुना देवत्वसंयोजनम् ? ।।

MILLIONAIRES

Indeed we promoted to the status of God all things including plants, marine creatures, birds, beasts, ghosts, goblins, men, stones and reptiles. For us who are thus reputed for conceiving millions of gods, is it not merely child's play to confer godhead now on two more, Allah and Christ ?

कोटचधीश

झाडेझुडपें, चलचर प्राणी, पशुपक्षी, भुतेंखेतें, माणसें, दगडधोंडे, सापकिरडें, – इतक्या सगळयांना ज्यांनी देवाच्या आसनावर बसवलें, त्या आम्हां देवसंख्येच्या बाबतींत कोटचधीश असलेल्या हिंदूंना, 'अल्ला' आणि 'ख्रिस्त' या दोघांवर देवांचा पोषाख चढ़वणें ही गोष्ट केवळ हातचा मळच नव्हे काय ?

□

सहिष्णुता

ताबूतानि पथि प्रयान्ति विभवैः, सीदन्ति नागाननाः;
बाङ्गो विध्यति खं, चपेटितमुखं तूर्यं क्षयत्युत्सवे ।
स्तूयन्तेऽकबराः, शिवप्रभृतयो विन्दन्ति निन्दां च यत्,
हेतुस्तत्र सहिष्णुता; जडमते ! नाद्यापि तां मुञ्चसि ? ।।

TOLERANCE

The *Taboots* parade the streets in pomp, while the *Ganapatis* lie low. The *Banga* soars in the sky, while the trumpets in (Hindu) festivals are smothered. Akbars are eulogised, and Shivajis are abused. The root cause of all this is tolerance. Fool, you still stick to it ?

सोशीकपणा

ताबुतें रस्त्यावरून थाटाने मिरवीत जातात; आणि गणपति कुढतात. बांगाची आरोळी गगनाला भिडते; आणि देवोत्सवांत वाद्यांची मुस्कटदाबी होते. अकबरांची भलावणी होते; आणि शिवछत्रपतींच्या कपाळीं निंदानालस्ती येते. या सगळ्याचें कारण आहे सहनशीलता. अरे निर्बुद्धा ! अजून तूं ती सोडत नाहीस ?

□

शान्तिपारमिता

निष्ठ्यूतं बहु नो वपुःषु यवन ! श्रान्तः किमेतावता ?
किं नास्मासु पदैरपि प्रहरसे ? किं वा न मेहस्यपि ? ।
किं नो गां न विलुम्पसे ? किमुत नो नाङ्गीकरोष्यङ्गनाः ?
मा भैषीर्वयमेकनाथपथगाः, शान्त्येकरक्ता वयम् ॥

एकनाथपथगाः – अत्र महाराष्ट्रप्रथिता साधुप्रवरस्य एकनाथस्य कथा अनुसंधेया । असौ महात्मा कदाचित् काश्यां गङ्गायां स्नातः प्रवाहात् तीरमागमत् । अनुपदमेव तीरस्थितः कश्चन यवनः ताम्बूलरसमिश्रितं मुखरसं तस्मिन् 'खाडिति कृत्वा निरष्ठीवत्' । सोऽपि साधुः 'काम एष क्रोध

एष ' इत्यादि गीतावचनं स्मरन् कोपलवस्यापि अवसरम् अदत्त्वा पुनः प्रवाहं प्रविश्य अस्नात् । ततश्च यवनः ष्ठीवति, एकनाथश्च पुनरपि स्नाति इति चक्रं प्रवृत्तम्, यावत् सर्वोऽपि यवनस्य मुखरसः समाप्तिमगमत् ।

PERFECTION IN PEACE

O Muslim ! you spat on us for a long time. Are you left tired by just this much? Why do you not kick us too ? Why, again, don't you even urinate on us ? Why do you not snatch our land (or, cow)? Why indeed do you not rape our women ?


Be not afraid. We are the followers of *Eknath* the saint; we are solely the worshippers of peace !

शांततेची परमावधि

हे यवना ! तूं आमच्या अंगावर आता पुष्कळ थुंकलास. एवढ्यानेच तूं दमून गेलास काय ! अरे, तूं आम्हांला लाथाहि कां मारत नाहीस ? किंवा आमच्यावर मलमूत्रहि कां टाकत नाहीस ? आमची गाय (किंवा भूमि) तूं कां बळकावत नाहीस ? आणि आमच्या स्त्रिया कां पळवत नाहीस ?

बाबा रे, भितोस कशाला ? आम्ही एकनाथ महाराजांचे वारसदार आहों. आम्ही केवळ शांततेवरच प्रेम करूं जाणतों !

□



कश्चित् केशः

यं स्थानादवरोपितं न मनुते स्वं
श्वाप्यमेध्याशनः,
स्थानस्थोऽपि 'न मीयते म' इति यः
फल्गूकृतः क्लिश्यते ।
केशः क्रोशति सोऽपि कस्यचिदहो !
स प्रत्यहं पूज्यते,
किं चापह्रियते प्रदीप्य नगरं
सोऽन्विष्यते, शुच्यते ! ॥

A CERTAIN HAIR

The hair, when removed from its place, is little cared for even by a dog feeding on refuse; and even when in its place, feels miserable as it is mortified when they say, 'Not a single hair of me can be harmed !' Even such a hair, Oh ! when it belongs to somebody, receives as great care as a treasure and is worshipped every day ! Not only this, it is stolen too, is searched for in the light of a whole city set on fire, and is deeply lamented !

एखादा केस

जो जागेवरून दूर झाला, म्हणजे त्याला घाण खाणारा कुत्रादेखील 'आपला' म्हणत नाही; जो जागेवर असला, तरी 'माझा केसदेखील वाकडा होणार नाही,' अशा उद्गारांनी तुच्छ ठरून कुढत बसतो; असासुद्धा केस 'कुण्या एकाचा' म्हणून कुणाची दौलत ठरतो! त्याची रोज पूजा करतात, – त्याची चोरीसुद्धा करतात, श्रीसंपन्न नगर पेटवून त्याच्या उजेडांत त्याचा शोधहि करतात, आणि त्याच्यासाठी रडतातदेखील!

□

केशकथा

केशः कोऽप्यवरोपितो हि शिरसः प्रक्षिप्यते कच्चरे,
केशः कोऽपि च तोल्यते धनपतेर्भूत्यातिशेते च ताम्।
केशः कोऽपि चकार यज्ञमथनं क्रोधात् पुरोत्पाटितः,
केशः कोऽपि च मूषकैरपहृतः सर्वां भुवं प्लोषति॥

धनपतेः – कुबेरस्य। द्वितीयतृतीयचरणौ भगवतः शिवस्य पुराणप्रथितं कथाद्वयं लक्षयतः।

Story of a Hair

A hair, when removed from the head, is thrown into the refuse. Another is placed in balance against the entire riches of *Kubera*, the lord of wealth, and surpasses them. A hair in the past plucked in rage exploded a whole sacrificial ceremony. And a hair today stolen by mice sets the whole land on fire!

केसांची कहाणी

एखादा केस डोईवरून उतरला की थेट कचऱ्याच्या पेटींत जातो. एखाद्या केसाची कुबेराच्या दौलतीशीं तुलना होते, आणि तिच्याहूनहि तो भारी ठरतो. फार पूर्वी एक केस क्रोधाने उपटून काढला गेला; आणि त्याने प्रचंड यज्ञाचा विध्वंस करून सोडला. आणखी एक केस उंदरांनी (किंवा चोरांनी) पळवला; आणि त्याने साऱ्या देशाला आग लावली !

□

प्रनष्टलब्धीयम्

' हन्त, क्व त्वमभूः? अहो बत गतो दिष्टचासि दृग्गोचरं !
कच्चित् त्वं कुशली? नमो भगवते! हे लब्ध, जीव्याश्चिरम्
अन्वेष्टास्य सभाज्यतामकृपणं, हर्तुः शिरश्छिद्यताम्,'—
आदेशः शपथेन यस्य भवति स्थानीव, तस्मै नमः ! ॥

अहो, चित्रः विश्वस्य व्यवहारः ! क्वचित् 'लब्धप्रणाशं' भवति, क्वचित् 'प्रनष्टलब्धीयम्'। यस्य — एतत् पदं यथा 'शपथेन' अन्वेति, तथा 'भवति'ना अपि। यस्य शपथः, यस्य च प्रत्ययः, ताभ्याम् उभाभ्यां नमः, इति फलितम्।

RECOVERY OF THE LOST

'Lo ! where had you been ? Good grace ! We could see you again ! Are you all right ? Victory to God ! O recovered one, may you live long ! ... Let its finder be honoured; and its thief beheaded ! '

We bow to him, at whose oath (also, for whom at someone's oath) the substitute fares like the original !

एक हरवला तो गवसला, त्याची गोष्ट

'अरेच्या! तूं होतास तरी कुठे? अहाहा, आमचें नशीब शिकंदर, म्हणून पुन्हा दृष्टीला पडलास! खुशाल आहेस ना बाबा? देवा, तुझीच रे कृपा! हे सापडलेल्या, दीर्घायुषी हो! याला ज्याने शोधून काढलें, त्याचा मोकळ्या हाताने सन्मान करा. पळवणाऱ्याचें डोकें उडवा!'

ज्याच्या शपथेवर (आणि ज्याला एखाद्याच्या शपथेवर) बदली हा मूळच्यासारखा वाटतो, त्याला नमस्कार असो!!

□

७. जगदेकराष्ट्रपद्धतिः

THE WAY OF ONE WORLD

'जय-जगत्'-प्रकरण

न वः पाणिनिः

स्नातः प्राङ्मुख आसितः कुशसमित्पाणिर्नवः पाणिनिः
पश्यन् गां हिमवत्प्रदेषु मृदितां चीनैः, शनैर्व्याकरोत् ।
चीनश्चूर्णयतीति, चोरयति वा, वा चीयतेर्वा छलेः –'
तावत् तद्दशनैर्धृतः स 'न-न-मे'त्यन्त्योपदेशं व्यधात् ॥

व्याघ्रं दृष्ट्वा आत्मरक्षणम् अविचिन्त्य 'व्याजिघ्रतीति व्याघ्रः' इति व्युत्पादयन् स्वस्थानस्थितः भगवान् पाणिनिः तेन भक्षितः, प्राणमोचनात् प्राक् च असौ 'अ अ इति' इति सूत्रं विरचितवान्, इति प्रथिता कथा । सा अत्र अनुसंधेया । 'न-न-मे'... – इदं सूत्रं प्रतिलोममपि पठितुं शक्यम् । उपदेशः – सूत्रम् ।

The New Panini

The modern *Panini*, one fine morning, bathed and sat facing east with sacred grass and sticks in his hand. Soon he saw on the slopes of the Himalayas a cow (also, land) attacked by the Chinese. Steadily and calmly, he analysed the word : ' Where does the word Chinese come from? From the root ' *choorn* ', — he who crushes; or from '*chur*', — he who steals; or from '*Chi*', — he who is inflated; or from ' *Chhal* ', — he who cheats ... '. And presently, he too was caught in the Chinese ' jaws; and he pronounced his last aphorism: ' Na-Na-Me ' (No, no, don't !).

अभिनव पाणिनि

अभिनव पाणिनि हा आंघोळ करून, हातांत दर्भ-समिधा घेऊन, पूर्वाभिमुख बसला होता. तेवढ्यांत त्याला हिमालयाच्या उतारावर चिन्यांनी गाय मारलेली (किंवा भूमि बळकावलेली) दिसली. तेव्हा तो शांतपणाने शब्दाची उकल करूं लागला,—'चिनी हा शब्द कसा घडला ? चुराडा करतो तो चिनी, किंवा चोरतो तो, किंवा फुगतो तो, किंवा लबाडी करतो तो,' – तेवढ्यांत तोहि त्याच्या जबड्यांत सापडला; आणि त्याने शेवटचें सूत्र रचलें, 'न-न-मे' (नाही, नाही, नको) !

□

श्ये न पा रा व ती य म्

कोष्ठालीयमपावृता, न च पतिः, घोषन्ति पारावताः,
श्येनो द्रागभिपत्य कांश्चिदकरोद् वैश्वानरीयं हविः।
शेषान् सप्रणति स्म वक्ति, 'सुहृदः! गच्छाम्यहं स्वस्ति वः!
यद् युष्मद्विषयातिलङ्घनमिदं प्रेम्णा कृतं क्षम्यताम्!'॥

को ष्ठा ली – पारावतनिवासः, पिजन होल्स। ननु यदि श्येनः चीनाः, के पारावताः?– भगवान् वेद! वै श्वा न री यं ह विः – प्रातराशः।

THE STORY OF THE HAWK

AND THE PIGEONS

The pigeon holes were thrown open; the keeper was away; the pigeons were noisy. Of a sudden, the hawk swooped on them and breakfasted on some. To those who survived, he said with a bow, 'My dear ones! I take your leave; may you fare well. This my incursion into your region was purely out of love. I hope you will forgive me!'

पा र वे आ णि स सा णा

खुराडें उघडें होतें. मालक कुठे तरी दूर गेला होता. खुषींत येऊन पारवे घुमत होते. तेवढ्यांत ससाण्याने झेप टाकून त्यांच्यांतल्या कांहींचा फराळादाखल फन्ना केला. वांचलेल्यांना तो अदबीने लवून म्हणाला, 'जिवलगांनो! येतों मी. सुखी असा! हें जें मीं तुमच्या हद्दींत पाऊल टाकलें, तें केवळ प्रेमाने, हें जाणून क्षमा करा!'

□

ऊर्णनाभः

'गृह्णीयामपि नाम दंशमशक नीलापिपीलादिकं,'
ध्यायन्नेवमुवाय जालमभितः कोऽप्यूर्णनाभो निजम् ।
तस्मिन् स स्वयमेव संनिपतितः (सुप्तौ ?) कदाचिद् भ्रमात्
पार्श्वस्थां गृहगोधिकामुदवदद्, 'भद्रे ! परित्रायताम् !'॥

नीला – मक्षिका । गृहगोधिका – पल्ली, हाऊस लिझार्ड; 'पाल' इति माहाराष्ट्र्याम् ।

THE SPIDER

A spider wove his net in the hope that he may catch some mosquitoes and gnats and wasps and flies. One day, through a mistake (in sleep ?), he himself got entangled into it; and called out to the nearby female house-lizard : 'Help ! Good lady, help !'

एका कोळियाने

'कुठे कांही डास-चिलट, माशी-मुंगी सापडेल,' अशा आशेने एका कोळ्याने सभोवती आपलें जाळें विणलें खरें, पण चुकून एकदा (झोपेंत ?) तो स्वतःच त्यांत गुंतून पडला ! तेव्हा त्याने जवळच असलेल्या एका पालीचा धावा केला, 'माझे आई, सोडवशील का ग मला ?'

□

कर्कोटः – शेषः

आलीढो गहनानलेन करुणं क्रोशन् नलेनावितः
कर्कोटो दशति स्म तं दशपदव्याजेन; दग्धः कलिः ।

भूतिं प्राप नलः ; तथा वयमपि प्राप्स्याम इत्याशया शेषे सर्वमकुर्म ; वेत्ति भगवान् भूतिर्मृतिर्वा भवेत् ।।

शे षे – अत्र केचित् ‘ ष ’कारस्य ‘ख’कारम् उच्चारम् इच्छन्ति । स र्व म् – दंशान्तम् ।

Shesh

Karkotaka the snake, when caught in a conflagration and crying pitifully for help, was saved by *Nala* whom he bit under the excuse that he heard him say, ‘*dasha*’ (ten; also, bite). Consequently, *Kali* was scorched; and *Nala* prospered. In the hope that we too may prosper like *Nala*, we executed all this (upto the bite) in connection with ‘*Shesh*’ the snake. (The last ‘*sh*’ in ‘*Shesh*’ is pronounced by some as ‘*kh*’.) God alone knows whether we will prosper or perish !

क र्को ट क आ णि शे ष

वणव्याने चहूंकडून वेढलेला कर्कोटक दीनवाणा आक्रोश करीत होता. नळाने त्याला आगींतून बाहेर काढलें. तेव्हा नळाने ‘ दश ’ (दहा; किंवा, चाव) म्हटल्याचें निमित्त करून कर्कोटक त्याला डसला; त्यामुळे (नळाच्या शरिरांतला) कलि भाजून निघाला आणि नळाचें कोटकल्याण झालें. तसें आमचेंहि होईल, या आशेने आम्ही शेषावर हा सर्व प्रयोग (डसण्यापर्यंतचा) केला. आता आमचा उत्कर्ष होणार कीं मृत्यु होणार, हें त्या एका देवाला ठाऊक ! (‘ शेष ’ या शब्दांतल्या ‘ ष ’चा कोणी कोणी ‘ ख ’ उच्चार करतात.)

मूषकदौत्यम्

शश्वद् भोगिकुलेन बद्धकलहं दृष्ट्वा कुलं नाकुलं
दौत्यायोदसहिष्ट मूषकबटुश्चीचीकृतैश्चापलात् ।
सख्यस्य ध्वजमुन्नमय्य च बिलं तस्य प्रविष्टः फणी
स्वीकृत्यातिथिसत्कृतिं गृहपतिं ताम्बूलयित्वा स्थितः ।।

MISSION OF A MOUSE

The mouse saw the eternal enmity of the mongoose and the snakes; and foolhardily, he volunteered to mediate between them with loud squeaks. Soon, under the banner of friendship, a snake entered his hole; and on being received as an honoured guest, he chewed the mouse as *pan* and made himself comfortable.



उंदराची शिष्टाई

मुंगसांचें सापांशीं असलेलें जन्मजात हाडवैर पाहून पाक मनाच्या बिट्ट्या उंदराने धिटुकलेपणाने ची-ची करीत दोघांमध्ये

शिष्टाई करण्याचें काम अंगावर घेतलें. आणि मग काय झालें ? मैत्रीचा झेंडा उभारून फू-तेह साप ' साप-उंदीर भाई भाई ' म्हणत त्याच्या घरांत शिरला; उंदराने केलेल्या आदरातिथ्याचा त्याने स्वीकार केला; आणि शेवटीं विडा म्हणून यजमानालाच तोंडांत टाकून त्याने मुखशुद्धि केली !

□

अ स्मा कं ल क्ष्मी:

' सीमारक्षिदलं हतं किमरिभि: ?' ' वृत्तं न हस्तं गतं ';
'आक्रान्ता किमु भू:?' ' पदं भुवि हि नस्तैर्न्यस्तमज्ञानत: '
'दूतो न: किमनादृतो?' ' ऽनृतमिदं, भिन्नो विदेशे क्रम:';
व्यक्तं संप्रति न: स्वपक्षविमुखी 'लक्ष्मी' रिपून् रक्षति

Our Laxmi

The daughter is to be washed and tidied up etc., etc., – let my husband attend to it. A book or an article is to be written, – my husband will do that too in no time. Scientific work, – husband; bringing clothes from the launderer, – husband; milk, – he; drawing pictures, – who else ?

Issuing such orders in quick succession, the dear lady, with deep affection and full confidence, visualises an eightfold husband !

आठ नवरे

मुलीचें तोंड धुणें 'वगैरे' करायचें आहे, – 'हे' करतील की ! पुस्तकबिस्तक लिहायचें आहे, – तें तर 'हे' चुटकीसरशी करतील ! शास्त्रचर्चा करायची आहे, – 'हे'; धोब्याकडून कपडे वगैरे, – 'हे'; दुधाच्या बाटल्या, – 'हे'; फोटोबिटो, – 'हे'! असे लागोपाठ हुकूम सोडणाऱ्या बाईसाहेबांना अति प्रेमामुळे जणूं एका नवऱ्याचे आठ नवरे दिसूं लागतात !

□

स्मरणशीला भार्या

'नित्यं विस्मरसी'त्यविस्मरणया प्राध्यापको भार्यया
भौमीयोद्वहनाय मित्रदुहितुः सोपायनं प्रेषितः।
तूर्यं नात्र कथं? न तारपसितं 'कुर्यात् सदा मङ्गलम्'?
सप्ताहात् परतो विवाह इति सोऽवेदीत् पठन् पत्रिकाम्॥

प्राध्यापकः हि नाम जनः विस्मरणस्य भूमिः, इति प्रथितं लोके। तस्य भार्या च प्रायेण अतीव स्मरणशीला, तेनैव किल जगच्चक्रम् अनाकुलं प्रवर्तते। अस्मिन् पद्ये ईदृश्येव काचित् जगच्चक्रयोगक्षेमकरी स्मरणखनिः निदर्शिता, या स्मृतेः अतीव तीव्रत्वात् आगामिनि सप्ताहे वर्तिष्यमाणस्य उत्सवस्य कृते पूर्वस्मिन्नेव सप्ताहे भर्तारं प्रेषितवती! भौमीयो-द्वहनाय – भौमे (मङ्गलवासरे) संपत्स्यमानस्य विवाहस्य कृते।

STRONG MEMORY

Taunting her husband, 'You are always forgetful,' a Professor's wife, (naturally) strong in memory, sent him with presents to attend the marriage ceremony of a friend's daughter scheduled to take place on a Tuesday.

(As he went to the place of marriage –) 'How is it that there is no sound of band here? Nor loud roars of "*kuryat sada mangalam*" (verses sung at the marriage ceremony, meaning, '..may ..always confer blessings') ?' He looked at the invitation, – the marriage was scheduled on Tuesday all right, but only a week later!

आ ठ व णी चा कां दा

'तुम्ही नेहमीच विसरत असतां !' असें एका प्राध्यापकाला त्याच्या बायकोने (नेहमीप्रमाणे) म्हटलें, आणि एका मित्राच्या मुलीचें लग्न मंगळवारीं व्हायचें होतें त्याला हजर राहण्यासाठी भेटीची वस्तु देऊन हाकललें. (कार्यालयांत जाऊन पाहतो, तों –) 'इथे वाजंत्री कां नाही ? आणि "कुर्यात् सदा"चा आरडाओरडाहि कसा नाही ?' त्याने खिशांतून निमंत्रणपत्रिका काढून पाहिली, – लग्न पुढच्या मंगळवारचें होतें !

□

को ऽ य म् ?

'कोऽयं सायमुपागमिष्यति गृहं ? ' भर्त्रेति पृष्टा सती
ब्रूते भद्रमुखी, 'स्नुषा ननु वृता मातृष्वसुर्या मम।
तस्या मातुलमातुलस्य दुहितुः श्वश्वा ननान्दुः सुतो
यां जायां वृतवान्, पितृव्यदुहितुस्तस्या भविष्यद्वरः '॥

नायं कूटश्लोकः। तदलं संबन्धनिर्धारणार्थं वृथा शिरःपीडनेन। संबन्धपरम्परास्मरणपाटवमात्रमत्र भद्रमुख्याः सुसूचयिषितम्।

Who ?

'Who is it that is coming to our house this evening ?' asked the husband.

The lady with an auspicious face replied : 'He is the would-be bridegroom of the daughter of the uncle of the girl, to whom has proposed the son of the husband's sister of the mother-in-law of the daughter

of the maternal uncle of the lady, who is the prospective daughter-in-law of my maternal aunt.'

हा कोण ?

'हा जो संध्याकाळीं आपल्या घरी (चहाला) येणार आहे, तो कोण ग ?'

नवऱ्याच्या या प्रश्नाला कारभारणीने उत्तर दिलें : 'अहो, माझ्या मावशीची ती अमकी सून होणार आहे ना, तिच्या मामाच्या मामाची जी मुलगी, तिच्या सासूच्या नणंदेच्या मुलाचें जिच्याशीं लग्न ठरलें आहे ना, तिच्या चुलतबहिणीचा हा भावी नवरा यायचा आहे !'

□

उद्वर्तनम्

'उत्तप्तान्यनले पतन्ति सहसा दुग्धान्यवज्ञाय मां,
दूरे यावदहं करोति कलशं त्रोटिर्जलोत्प्लावितम् ।
पात्राणि प्रलुठन्ति हन्त चरणस्पृष्टान्यनालोकनात्,
उद्वृत्तं सकलं बते'ति गृहिणी काचं बभञ्ज क्रुधा ।।

सद्वृत्तानि दुग्धानि उत्तप्तानि सन्ति स्वयमेव चुल्लयाः सपात्रम् अवतरन्ति, सद्वृत्ता त्रोटिः (जलवाहिनी नलिका) कलशं पूरयित्वा स्वयमेव विरमति, पात्राणि चरणमार्गात् स्वयमेव अपसरन्ति, इति ज्ञेयम् ।

Disobedience

'The milk, when overheated on the stove, jumps into the fire in defiance of my

order ! While I am away, the water tap makes the bucket overflow ! The utensils too, alas ! if the feet touch them by chance, tumble on the floor ! Everything here is lawless ! '

With these words, the housewife crashed a glass in fury.

वळणच नाही !

' दूध तापत ठेवलें, तर तें खुशाल मी परत यायच्या आंत उतू जातें ! जरा कुठे इकडे तिकडे जावें, तों नळाखाली लावलेली कळशी वाहून जाते ! चुकून दुर्लक्ष होऊन पाय लागला, तर भांडीं-सुद्धा मेलीं आडवीं होऊन गडबडा लोळण घेतात ! बाई बाई बाई !! या घरांत कश्शाला म्हणून वळणच नाही !' असें म्हणून सुगरणीने हातांतलें कांचेचें भांडें रागारागाने दाणकन् आपटून फोडलें !

□

त्वं मदधिका

यावत् ते स्तवनं प्रियं मम, ततो मद्दूषणं ते प्रियं ;
यावच्छ्रोतुमना अहं, तदधिकं त्वं वक्तुकामासि यत् ।
अत्तुं यावदहं क्षमस्तदधिकं श्रीणासि भोज्यं यतः ;
यावानर्जयितास्म्यहं तदधिकं युक्तं करोषि व्ययम् ॥

कश्चित् 'सः' 'तां' प्रति आह ।

You Always Exceed Me !

You like to censure me more than I like to praise you. You wish to speak more than I wish to hear. You cook more than

I can eat. It is then perfectly appropriate that you spend more than I earn !

तूं माझ्याहून अधिक !

तुझी तारीफ करायला मला जेंवढें आवडतें, त्याहून अधिक मला नांवें ठेवणें तुला आवडतें. मला जेवढें ऐकावेंसें वाटतें, त्याहून अधिक तुला बोलायला हवें असतें. माझी जेवढें खाण्याची तयारी असते, त्याहून अधिक तूं अन्न शिजवून ठेवतेस. तेव्हा मी जितकें कमावतो, त्याहून अधिक तूं खर्चतेस, हें सरळच नाही का ?

□

गुरुलाघवम्

व्याख्यानं न, न नाटकं, न च चलच्चित्रं, न संमेलनं,
संभूयभ्रमणं न नोऽस्ति सुलभं, देशाटनं दूरतः ! ।
अस्त्यस्माकमवेक्षणीयमनिशं संमार्जनीयं गृहं,
कर्तव्यं पटधावनं, तरुलताः सेच्याः, विधेया चहा ।।

DISCRIMINATION

No lecture, no play, no picture, no gathering; even walking together has become difficult for us, much more so a pleasure trip. For, we have to watch the house constantly, sweep it, wash clothes, water plants and prepare tea !

तारतम्य

ना व्याख्यान, ना नाटक, ना सिनेमा, ना सभासंमेलन, ना हिंडणें फिरणें, – कांही कांही म्हणून आम्हांला करितां येणार नाही. प्रवास तर दूरच ! कारण आम्हांला की नाही, घराची सतत राखण

करायची असते; झाडलोट असते ; धुणें, झाडांना पाणी, चहा, – हें सगळें करायचें असतें. वेळ काढायचा तरी कुठून ?

□

प्र स व स मृ द्धिः

यद् देवाद्युपयाचनं, यदपि वा बाबाबुवाद्यर्चनं,
यद् भैषज्यनिषेवणं च नियतं, यन्मान्त्रिकोपासनम् ।
मूढानामनपत्यतापरिहृतेः सर्वेऽप्युपाया इमे ;
सुन्तामात्रसमाश्रयात् तु विबुधाः प्राज्यां प्रजां चक्षते ।।

सु न्ता – इस्लामप्रथितः पुमपत्यसंस्कारविशेषः । (प्राज्ञाः! नातः परं कथयितुं शक्यम् ।) वि बु धाः – नचिरात् दिवं गताः केचित् महाराष्ट्रियाः इतिहासपण्डिताः। तेन प्रकृतपदं सविशेषम् अर्थवत् भवति ('विबुधाः सुराः' इत्यमरः) ।

FERTILITY

Vows of offering to the deities, devout service of saintly *Babas* and *Buwas*, regular administration of medicines, devotion to the spell-priests, – all these are the fools' measures to beget a child. But the wise men (e. g. a recently departed scholar of Mahratha history) assure abundant progeny just by an operation of the *Sunta* rite !

उ दं ड सं त ति !

देवांदगडांना नवस, बाबाबुवांची सेवा, नियमित औषधसेवन, मांत्रिकांचे आर्जव, आणि काय काय, – मूल व्हावें म्हणून खुळचट

लोक काय उपाय करीत असतात! शहाणे लोक (नुकतेच दिवंगत झालेले एक इतिहासपंडित!) मात्र सांगतात की, नुसती 'सुंता' केली की पुरे! मुलेंच मुलें!!

□

'तातं तालय'

जाता जातु विलाप्य वक्षसि दृढं पित्रा भृशं चुम्बिता,
दष्टा कोमलयोः कपोलफलयोः शल्योपमैः श्मश्रुभिः।
मातुः संस्पृशती मुखं मृदु सुखं सभ्रूविभङ्गाब्रवीत् –
'तातं तालय!'; न त्वबुद्ध जननीहासस्य मुग्धाशयम्॥

जाता – वत्सा। विलाप्य – विपूर्वायाः लीयतेः ण्यन्तायाः ल्यबन्तम्; आश्लिष्य इत्यर्थः। मृदु सुखम् – हे भगवन्! कियान् अयं भेदः! किमिति तातस्यापि मुखम् ईदृगेव न निर्मितम्? तालय – ताडय। अबुद्ध – अजानात्। मुग्धा – अर्थात् जाता, कन्या; कर्तृपदम्। मुग्धा नाबुद्ध; विदग्धाः बुध्येरन् इति आशास्महे।

Beating the Father

The father once kissed his young daughter heavily, clasping her to his heart; and the fruitlike, delicate cheeks of the poor child were bitten by the father's arrowlike moustaches. The girl then feeling the soft, snug face of her mother, passed the sentece with knitted eyebrows, ' Give papa a

beating !' The mother burst into a laughter; but the innocent child could not divine why.

बा बां ना ठो क दे !

एकदा असें झालें की, एका पित्याने आपल्या लाडक्या बाळीला छातीशीं घट्ट धरून तिचे मुक्यावर मुके घेतले. बिचारीचे कोवळे कोवळे गाल मिशांचे कांटे टोचून टोचून हुळहुळे झाले! सुटका झाल्याबरोबर तिने आईकडे धाव घेतली; तिच्या मुलायम तोंडावर एकदा हात फिरविला (देवा रे देवा ! सगळयांचींच तोंडें अशीं गुळगुळीत कां नाही केलीस ?), आणि आंठ्या घालून आईला म्हटलें, 'आई ग, बाबांना की नाही, खूप ठोक दे !' आई खदखदून हसली. बिचाऱ्या अश्राप मुलीला तिच्या हसण्याचा अर्थ कळलाच नाही !

□

'अ प भा षि त वै'

'यक्तां तात फुगां गिहान, बयपीम् आम्बयत्य माम् आनय,
त्योकं पाथय नूतनं, कथय वा क्युत्नत्य मय्यं कथाम्।
तुय्यं देव नमच्कयोमि, तुमती तातत्य मे दीयतां,' –
मा भूत् साधुपदप्रयोगसुकृतं, जाते ! प्रियं ते वचः ॥

अत्र चरणत्रयस्य संस्कृतच्छाया – 'रक्तां तात फुगां गृहाण, बरफीमाम्रस्य मामानय, श्लोकं पाठय नूतनं, कथय वा कृष्णस्य मह्यं कथाम्। तुभ्यं देव नमस्करोमि, सुमति-

स्तातस्य मे दीयताम् '। फुगा – बलून। बरफी – खाद्य-विशेषः। मा भूत्... – अत्र अनुसंधेयम् : 'तस्माद् ब्राह्मणेन न म्लेच्छितवै, नापभाषितवै ' इत्यादि महाभाष्ये उद्धृतं श्रुतिवचनम् । तथा च – ' समानायामर्थावगतौ शब्देन चापशब्देन च, तत्र धर्मनियमः क्रियते, शब्देनैवार्थोऽभिधेयो नापशब्देनेति, एवं क्रियमाणमभ्युदयकारि भवतीति ।'

IN DEFENCE OF UNREFINED SPEECH

(This stanza is untranslatable; for a three-fourth of it is composed in baby talk. Its interest lies more in its pronunciation than in its contents.)

'Papa ! Buy me the red balloon. Bring me the mango sweets. Teach me a new verse or tell me the story of Krishna. God ! I bow to you ! Make my papa wise.'

Confound the refined speech that brings merit ! Baby dear,. I love your talk !

बोबडे बोल

' तात, मया (मला) याय (लाल) फुगा आना;' ' मया आंब्याची बयफी घेऊन या;' ' मया नवा त्योक (श्लोक) तिकवाय ?' ' क्युत्नाची गोत्त शांगाय ? ' ' बाप्पा, तुया नमच्काय ! बाप्पा, तातांना चांगयी बुद्धी दे !'

शुद्ध बोललें की पुण्य लागतें म्हणतात. तें नाही मिळालें तरी फिकीर नाही ! बाळ, तुझे हे अशुद्ध बोबडे बोलच मला प्यार आहेत !

□



बाल्याय तस्मै नमः

सायं द्योतितदीपवन्दनविधेरूर्ध्वं
जनन्योदितं,
'तातादीनधुना नमस्कुरु सुते !'
वत्सा च भक्त्यानमत् –
अम्बां तातमथानयोः पितृगणं
भ्रातॄन् स्वसॄः किंकरान्
मार्जारं शुकमप्यहो !
समदृशे बाल्याय तस्मै नमः ॥

समदृशे – अत्र विमृश्यतां यदुक्तं गीतासु : 'विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥'

WE BOW TO THE CHILDHOOD

The evening prayer to the lighted lamp was over. The mother bade her daughter, 'Now, baby dear, bow to your father and others.' The child then piously bowed to her mother, father, their parents, brothers, sistrers, servants, – nay, even the cat and the parrot in the cage too !

We bow to the childhood which is endowed with such a perfect equanimity !

त्या बाळपणाला नमस्कार असो !

संध्याकाळीं दिवे लागल्यावर 'शुभं करोति' म्हणून झालें. मग आईने चिमण्या लेकीला सांगितलें, 'बाळ, आता बाबांना आणि

सगळ्यांना नमस्कार कर हं ! ' तेव्हा तिने पुढील व्यक्तींना भक्तिभावाने नमस्कार केला, – आई, बाबा, त्यांचे आईवडील, भाऊ, बहिणी, नोकरचाकर, मांजर आणि पोपटसुद्धा ! असली समदृष्टि बाळगणाऱ्या त्या बाळपणाला आमचा नमस्कार असो !

□

वि ज ल्पि त म्

' कृष्णो नाम बभूव, तस्य जननी कॉलेजमासीद् गता,
सोऽखादन्नवनीतमन्यसदने, बद्धस्तदोलूखले ।
सोऽरोदीत्,उपधाव्य चास्य जननी मुक्त्वाददाद् गोलिकाः,'
– मत्तस्येव शिशोर्विजल्पितमिदं गेहे चिरं जीवतु ।।

कश्चन शिशुः जनन्यै कथां कथयति । सेयम् । गो लि काः – शार्करीः ।

PRATTLE

' There was one, *Krishna*. His mother had gone to the College. He stole butter from others' houses and ate it. Then he was tied to a wooden mortar. He cried; and soon his mother ran back, relieved him and gave him lemon balls. '

May this prattle of the baby, similar to that of a madman, live forever in the house !

बडबड

'एक होता कृष्ण. त्याची आई गेली होती कॉलेजांत. त्याने एकदा लोकांच्या घरीं (चोरून) लोणी खाल्लें. तेव्हा लोकांनी त्याला उखळाला बांधून घातलें. मग तो लागला रडायला. मग त्याची आई आली धावत धावत. तिने त्याला सोडवलें; आणि लिमलेटाच्या गोळ्या दिल्या खायला.' असली वेडगळासारखी लहान मुलाची बडबड घरांत कायम नांदो !

□

अस्थानरतिः

'मा नासां सुत निष्कुषाण, वदने मा पुत्र धेह्यङ्गुलिं,
मा निष्ठीव पथि क्वचित्, कमपि रे गालीपदैर्मा तुद'।
ज्येष्ठा इत्थमनित्थमात्मचरणाः प्राहुस्तदास्तां; परं
कैषामस्वमुखादिकर्मसु नृणामास्था ? न जानीमहे ! ॥

Misplaced Interest

'Son, don't poke your nostrils. Don't suck your finger. Don't spit anywhere on the street. Don't hurt anybody with abuse.' Thus the elderly people teach me, themselves not complying with the rules. I don't mind it. But I fail to understand why these elderly people evince so much interest in the affairs of noses and mouths that do not belong to them !

नसती उठाठेव

'हें बघ बाळ, नाक टोकरूं नको;' 'तोंडांत बोट घालूं नको;' 'रस्त्यांत थुंकायचें नाही हं;' 'हां, शिवी नाही द्यायची कुणाला !' असें कांहीतरी मोठीं माणसें सारखीं सांगत असतात; स्वतः मात्र हें सगळें करीत असतात. तें जाऊं द्या ! पण मला हें समजत नाही की, आम्ही हें सगळें आमच्याच हातांतोंडांनी करीत असतांना यांना त्यांत लक्ष घालण्याचें काय कारण ?

□

११. तत्त्ववित्पद्धतिः

THE WAY OF THE THINKER

त त्त्व ज्ञ प्र क र ण

श्ली ला श्ली ल वि वे कः

विद्वांसोऽपि गता यतोऽत्र विमतिं 'का श्लीलताश्लीलता?
श्लीलेऽश्लीलमतिं यतो विदधतेऽश्लीलेऽपि च श्लीलताम् ।
तत्त्वं तेन समासतो विवृणुमः – सर्वेऽपि यत्रोत्सुकाः,
अश्लीलं तदुदीर्यते; यदितरत्, श्लीलं तदाख्यायते ॥

कर्म इव एव गहनोऽयं विषयः – 'किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः'; तथा 'कर्मण्यकर्म यः पश्येत् ... ' इत्यादि स्मर्तव्यम् । यस्मादेवं तस्मात् – '(तेन) ब्रूमः सहृदयमनःप्रीतये तत्स्वरूपम् । '

DISTINGUISHING DECENT FROM OBSCENE

Whereas even the learned are divided as to what is decency and what obscenity;

and whereas they even regard as obscene what is really decent, and as decent what is really obscene; therefore we briefly expound the true nature of these two : obscene is that in which all are interested; all the rest is decent.

श्लील आणि अश्लील

'श्लील म्हणजे काय, आणि अश्लील म्हणजे काय,' या मुद्द्यावर विद्वानांचेसुद्धा मतभेद झाले आहेत; कोणी तर श्लीलालाच अश्लील समजतात, आणि अश्लीलाला श्लील समजतात. म्हणून या विषयांतलें सत्य आम्ही संक्षेपतः सांगतों, — ज्यांत सर्वांनाच गोडी, तें अश्लील; राहिलेलें श्लील.

□

अश्लीलता

स्त्रीदेहस्य विवस्त्रणं यदि भवेदश्लीलतागोचरं,
पुंदेहस्य कुतस्तथा न तदिति प्राज्ञाः समाचक्षताम् ।
'अक्ष्णोऽसौ विदितोऽल्पवस्त्र' इति चेत्,
स्त्रीणामपि स्यात् तथा;
'स्त्रीदेहो' यदि 'कामधुक्क्षण' इति,
ब्रह्मा ततो दूष्यताम् ।।

अति हि नाम एतेषु दिवसेषु श्लीलाश्लीलचर्वणं कुर्वन्तः दृश्यन्ते कलासाहित्यमार्तण्डाः। तत्र वदामः... ।

Obscenity


If feminine nude is to be counted obscene, let the wise explain why the male nude is not. If it is argued that people are used to seeing the male body bare, we

ask, would they not be used to seeing the female one too ? If, again, you argue that the female form (when unclad) inflames passion, then why, blame the Creator !

अ श्ली ल ता

स्त्रीदेहाचें वस्त्रहीन चित्रण हें जर अश्लील ठरत असेल, तर पुरुषदेहाचें तें तसें कां नाही, याचें विद्वानांनी उत्तर दिलें पाहिजे 'तो (=पुरुषदेह) तोकड्या वस्त्रांनिशीच दृष्टीला सवयीचा झाला आहे म्हणून,' असें म्हणाल, तर स्त्रीदेहहि तसा सवयीचा होईल की ! 'स्त्रीदेह हा कामोत्तेजक आहे म्हणून,' असें म्हणाल, तर दोष ब्रह्मदेवाला द्या की !

□



वि नो द ना नि

अक्षैः केऽपि विनोदयन्ति हृदयं,
केचिच्च सौरै रसैः,
केचित् काव्यरसैश्च, केऽपि कलहै-
र्वित्तापहारैः परे ।
रेखाजालचितात्मभालपटले
विन्यस्य हस्तं दृढं
वीक्ष्योद्वीक्ष्य न वीक्ष्य रिष्टपदवीं
केचित् तु चिन्ताशतैः ॥

सौ रैः र सैः – सुराभिः । प्रकारपरं बहुवचनम्, वैपुल्यपरं वा, – यथारुचि गृह्यताम् ।

AMUSEMENTS

Some divert their minds by playing dice, some by drinking liquor, some by savouring poetry, others by quarrelling, still others by theft. There are, besides, some who, in calamity, actual or anticipated, divert themselves with care, their hands supporting knitted foreheads.

वि रं गु ळा

कुणी जुगार खेळून मन रमवितात, कुणी मदिरेचें सेवन करून, कुणी काव्यरस पिऊन, कुणी भांडून, कुणी चोऱ्या करून; पण कुणी मात्र आठ्यांनी सुरकुतलेल्या कपाळावर हात घट्ट धरून, काळज्याच काळज्या करून मन रिझवितात, – संकट दिसतें म्हणून काळजी, दिसत नाही म्हणून काळजी, संकटाची कल्पना करून काळजी,... काळजी, काळजी, काळजी ... !

□

श्र द्धा

'ना विष्णुः पृथिवीपतिः,' – यदवदंस्तच्चेन्मृषा कथ्यते,
'सर्वेऽप्यत्र समाः,' इतीयमभिधा सत्येति कः प्रत्ययः ? ।
पूर्वत्रापि जनाः सुखानि विविदुः, क्लेशं परत्रापि च;
श्रद्धैव व्यवहारकारणमतः, श्रद्धा च तर्कोत्तरा ।।

FAITH

'The man who rules the earth is God *Vishnu* himself,' – if this doctrine is to be denounced as false, a myth, can anyone prove the truth of the doctrine, 'All are born equal'? People have been happy even under the former doctrine, and miser-

able under the latter. This means : faith alone is the basis of all human dealings; and all faith lies beyond reason.

श्रद्धा

'पृथ्वीचा स्वामी तो ईश्वरांश,' असें जें म्हणत तें जर खोटें, तर 'सर्व लोक सारखे,' हें तत्त्व तरी खरें समजण्यास काय प्रमाण आहे ? पहिल्या तत्त्वाच्या छत्राखालीहि लोक सुखी झाले, आणि दुसऱ्याच्या छत्राखालीहि लोक दुःखी झाले, असें दिसतें. एकूण काय, श्रद्धा हें सर्व व्यवहाराचें मूळ आहे, आणि श्रद्धा ही तर्काच्या निकषापलीकडे आहे.

□

मूर्खधूर्तौ

धर्मो वस्तु सदित्युशन्ति कतिचित्, तैस्तद्ग्रहावेशतो
'धर्मः सत्य इहैक एव, स ममे'त्येवं प्रतिज्ञायते ।
धर्मः कल्प्यत इत्युपैति विदुषां येषां तु धीर्निश्चयं,
ते धर्मानखिलान् वदन्त्यवितथान्; कः कल्पितेष्वाग्रहः ? ।।

'ममैव धर्मः सत्यः' इति प्रतिपादनं यावत् सत्यमसत्यं वा, तावदेव 'सर्वे धर्माः सत्याः' इत्यपि ।


The Fool and the Clever

Some who think religion real swear ardently : 'There is only one true religion, and that is mine !' The enlightened ones, on the other hand, who are convinced that religion is imaginary, accept all religions to be true; for, what use is it contending for what is after all imaginary !

मू र्ख आ णि धू र्त

धर्म ही खरी, वास्तव गोष्ट आहे, असें कोणाकोणाला वाटतें. ते या समजुतीचा पगडा मनावर बसल्यामुळे 'या जगांत खरा धर्म एकच, आणि तो म्हणजे माझा,' असें शपथेवर सांगतात. पण धर्म ही कल्पनासृष्ट वस्तु आहे हें ज्या जाणत्यांच्या मनाला उमजतें, ते म्हणतात, 'सगळेच धर्म सत्य आहेत.' खरेंच आहे; जें काल्पनिकच, त्यांत हट्ट कसला ?

□



ई श्व र स्य पि ता

'धर्मे शास्त्रमिह प्रमाण'मिति चेत्,
शास्त्रस्य कः कारकः ?
'श्रीशः'; तस्य तु कः ? 'न कश्चिद्';
अनृतं, श्रीशस्य लोकः पिता ।
तज्जानात्यलमीश्वरः, न तु जनः;
धर्मस्य शुद्धौ ततः
नेशः किं तु जनो रुणद्धि; तदिदं
प्राज्ञाज्ञयोरन्तरम् ।।

The Father of God

If you say, 'Scriptures are the authority on religion,' we ask, who made the scriptures ? 'God,' – all right; and who

made Him ? 'None,' – this is a lie ! Man is the father of God. This, God knows very well; men do not. That is why, when religion faces change, it is men that oppose change, not God. This is where the ignorant differs from the informed.

ईश्वराचा बाप

'धर्माचें स्वरूप ठरतें तें शास्त्रानें,' असें म्हणत असाल, तर शास्त्राचा कर्ता कोण हो ? 'ईश्वर'; ठीक. त्याचा निर्माता कोण ? 'कोणीच नाही'; साफ खोटें. माणूस हाच ईश्वराचा बाप ! ही गोष्ट ईश्वराला चांगली ठाऊक आहे; माणसाला मात्र ठाऊक नाही. त्यामुळे धर्मसुधारणेला विरोध ईश्वर नव्हे, माणूसच करतो. जाणत्यानेणत्यांमधलें अंतर तें हेंच !

□

देवस्य शुल्कश्रेणी

अक्ष्णैकेन विलोकने दश, तथा द्वाभ्यां कृते विंशतिः,
षष्टिर्गन्धविमर्दने, स्रज उरस्याधापने द्वे शते ।
शुल्कं रूप्यसहस्रमर्धघटिकाभोगार्थमित्यादिभिः
धूर्तैः संप्रति कुट्टनीव्यवसितैर्देवोऽपि वेश्यीकृतः ॥

ननु भोः ! साम्प्रतिके काले सर्वत्रापि सशुल्के स्थिते व्यवहारे देवेनैव केवलेन किमपराद्धम्, यदेवं तस्य शुल्कश्रेणी दूष्यते ? श्रूयताम् । न वयं ब्रूमः देवः अपराध्यति इति । किं तर्हि ? भक्ताः एव । स्थिते चैवं सशुल्के दैवे व्यवहारे शुल्कग्राहिणां विटचेटकुट्टनीस्थानीयत्वं शुल्कदायिनां च वेश्यालम्पटस्थानीयत्वं कथं निवारयितुं शक्यम् ?

Rates of God

For beholding God with one eye, ten rupees; with two eyes, twenty. For applying unguents, sixty; and for garlanding, two hundred. A thousand rupees for half an hour's service. By these acts of a procurer, rogues have today turned God into a prostitute !

देवाचें दरपत्रक

एका डोळ्याने दर्शन घ्यायचें असेल, तर दहा रुपये ; दोनांनी घ्यायचें झाल्यास वीस; चंदन चोपडण्यासाठी साठ; छातीवर हार घालण्यास दोनशे; अर्ध्या घटकेच्या भोगांसाठी एक हजार; – याप्रमाणे कुंटिणीचा मार्ग चोखाळून लबाड लोकांनी आज देवालासुद्धा बाजारबसवी करून सोडलें आहे !

□

भगवतां कुलम्

स्पृष्ट्वा पादरजो, विलोक्य वदनं, पीत्वा क्षणं वाक्सुधां
यस्य, स्यात् पुरुषः प्रनष्टदुरितः सर्वं लभेतेप्सितम्।
अद्यत्वेऽपि नृरूपिणां भगवतामुज्जृम्भते तत् कुलं; –
न क्वाप्यप्रणमय्य शीर्षमयते प्रायः पुमान् निर्वृतिम्॥

नृरूपिणां भगवताम्, – यतः एते देवस्य 'अवतार'-त्वेन भक्तैः प्रख्याप्यन्ते । परोत्कर्षासहिष्णवस्तु एतान् बकव्रतिनः बिडालव्रतिनः वा आहुः।

The Community of the Worshipful

Even today thrives the well-known cummunity of worshipful Gods disguised as men, at the mere touch of the dust of whose feet, at the sight of whose faces, at a momentary sip of whose nectar-like words, man, soon getting rid of all sin, acquires everything that he wishes.

Indeed, no one feels happy unless he bows his head at somebody's feet !

प्रभूंची मांदियाळी

ज्यांच्या पायाची धूळ मस्तकीं धरली, मुखदर्शन घेतलें, शब्द-सुधा क्षणभरदेखील प्राशन केली, की माणसाचें सर्व पातक नष्ट होऊन त्याला इष्ट तें सर्व प्राप्त होतें, अशी त्या नरदेहधारी प्रभूंची मांदियाळी आजघडीलाहि फोफावत आहे. एकंदरीनें हेंच खरें की, कुठेतरी डोकें टेकल्यावाचून बहुतेक-करून माणसाला शांति वाटत नाही !

□

सर्वं शून्यम्

'सर्वं शून्यमिदं,' जगाद सुगतो, लोकेऽत्रजन्मान्यतां,
पूज्यं तन्नखकेशदन्तमभवत्, संघोऽस्य चास्फायत ।
तत् किं बुद्धनखादिसंघवचने नासज्यते शून्यता ?
किं वात्रापि चकास्ति विश्वविदिता शून्ये जनानां रतिः ? ॥

तृतीयचरणे बुद्धः, नखादीनि, संघः, वचनं (अर्थात् बुद्धस्य) च एतेषां समाहारः कर्तव्यः ।

ALL IS VOID

'All is void,' – said the *Buddha*, and became renowned. His nails, hair and teeth came to be worshipped; and his organisation throve. Does this mean that the all-pervading void does not extend over the *Buddha's* nails etc.? Or does this substantiate the universally known fact that people pursue the void?

सारें असार

'हें सारें असार आहे,' बुद्ध म्हणाला, जगांत मान्यता पावला, त्याचे नखें-केस-दात पूजार्ह ठरले, आणि त्याचा संघहि सर्वत्र फोफावला. आम्ही विचारतों की, ही साऱ्या ठिकाणीं असणारी असारता बुद्ध, त्याचीं नखें वगैरे, त्याचा संघ, त्याचा उपदेश यांच्या ठिकाणीं विसावते कीं नाही? कां लोकांना असाराचीच ओढ असते, हें विश्वविख्यात तत्त्व याहि उदाहरणांत प्रकटलें आहे?

□

सुन्दरी

जानाना अपि 'वानरी'ति जगदुर्नारीं जनाः सुन्दरीं
यद् दाक्षिण्यवशात् तथैव तदिति स्त्री सस्मितं श्रद्दधे।
अद्यत्वे किल मन्त्रिणामपि मुखाद् 'हे सुन्दरी' त्युत्थितां
गां सुन्दर्यपि धिक्करोति सदसि, श्रद्धेयमेतत् कथम्? ॥

सु न्द री – फेअर लेडी । महाराष्ट्रराज्यस्य विधान-सभायां किल अयं प्रसङ्गः समुदभूत् । म न्त्रि णा म पि – अपरपरमेश्वराणामिति भावः । केचित् तु आहुः, मन्त्रिमुखोद्गतत्वमेव धिक्कृतौ हेतुः । कः/का खलु प्राज्ञः/प्राज्ञा मन्त्रिणां वचसि विश्वासं कुर्यात् ?

FAIR LADY

In the past, men used to call a woman 'fair lady' out of chivalry, even when they knew her to be really a she-monkey; and the woman, too, with a smiling face, believed their words. Today, it is reported, even a fair lady publicly denounces her being addressed as 'fair lady' even when the phrase springs from the lips of such a dignitary as a minister ! We wonder, how to believe this !

'सुं द री'

आजपर्यंत असें झालें की, वानरी वाटत असतांनाहि लोक स्त्रीला दाक्षिण्यामुळे 'सुंदरी' म्हणत आले; आणि स्त्रीहि स्मित करून तें खरें समजली. आजकाल मात्र मंत्र्यांच्यासुद्धा (म्हणजे, साक्षात् परमेश्वराच्याच की!) तोंडून 'सुंदरी' (फेअर लेडी) असे शब्द प्रकटलेले ऐकून सुंदरीदेखील म्हणे भर सभेंत त्यांचा धिक्कार करूं लागल्या आहेत ! आता यावर विश्वास तरी कसा ठेवावा ?

□

सिनेसुन्दरी

'दृष्ट्याकेकरया शतं, दशशतं गत्या नतोन्नीतया,
लक्षार्धं किल नर्तनैः, परिमितैर्वस्त्रैश्च लक्षद्वयम्।
सा कापि प्रतिचित्रमर्जति बत ! द्रव्यं सिनेसुन्दरी,
किं चाभ्रंलिह–' सर्वमस्तु, वद सा भोज्यं कियत् खादति ?

अस्तु नाम अर्जनशक्तिः अपरिमिता; भोगशक्तिस्तु नृणां परिमितैव, इति तात्पर्यम्।

THE FILM STAR

'Heard this ? That X Y Z, the famous actress, charges a hundred for casting just a sidelong glance ; a thousand for a hip-swinging gait ; half a lakh for dancing ; two lakhs for wearing the minimum clothes. At this rate, indeed, she makes money in every picture ! Besides, a sky-scraping —'

'Well, well ! Granting all that, tell me how much she eats.'

सिनेसुंदरी

एक आवाज – 'अहो, ऐकलंत का ? ती अमकीतमकी सिने-नटी प्रत्येक चित्राच्या वेळीं काय कमाई करते ! तिरपी नजर टाकली की शंभर; लचकत मुरडत चालली की हजार ! नाचाला पन्नास हजार ; आणि माफक कपडे घातले की दोन लाख ! आणि म्हणे टोलेजंग –'

दुसरा आवाज – 'हो हो हो, ठीक आहे. पण ती भात केवढा खाते सांग !'

□

वर्णव्यत्ययः

अप्राप्तोपचयं निशम्य मथितं सत्त्वोज्ज्वलं जीवनं
सद्यो विश्वमभूद् विमूढमखिलं मग्नं च शोकार्णवे ।
तत्रोच्चैः करतालमत्तहसितैश्चीनाः क्षणं कुर्वते, —
वर्णव्यत्ययमात्रतः क्वचन किं नीचत्वमाच्छाद्यते ? ॥

सत्त्वोज्ज्वलं जीवनम् — अमेरिकाध्यक्षस्य तत्रभवतः केनेडीमहाभागस्य । क्षणम् — उत्सवम् । वर्णव्यत्ययः — ' चीन 'शब्दः ' नीच 'शब्दात् वर्णविपर्यासेन आगतः इति मन्यामहे ।

METATHESIS

At the news of the sudden end of a bright life of virtue and courage, the whole world was stunned and sank into an ocean of grief ! On this occasion, what did the Chinese do ? They celebrated it with loud clapping of hands and roars of laughter ! Indeed, can a mere metathesis (*Nicha–China*) conceal the baseness of a people ?

वर्णविपर्यय

शौर्यधैर्यांनी उजळलेलें एक जीवनपुष्प पूर्ण विकास होण्याआधीच कुस्करलेलें पाहतांच सारें जग सुन्न होऊन दुःखसागरांत बुडून गेलें ; तर चीन मात्र मोठ्यानें टाळ्या पिटून आणि खदखदा हसून सण साजरा करण्यांत दंग झाला !

बरोबरच आहे. (नांवांतल्या) अक्षरांची उलटापालट केली (नीच – चीन) म्हणून काय कोठें नीचपणा झाकून राहतो ?

□

मा न व स्य आ ग्र हः

जीवो, ब्रह्म, तदैक्यम्, अस्य जगतो जन्मादिहेतुश्च तत्,
तज्ज्ञानादपवर्गः, – एतदखिलं को वेद सत्यं न वा ।
सत्यं नूनमिहैकमेव, – विषयो वादस्य नैवास्ति यत्, –
जानाम्यस्मि करोमि चेति सततं यन्मानवस्याग्रहः ।।

MAN'S OBSTINACY

Jiva the individnal soul, *Brahman* the universal soul, their essential unity, the *Brahman* causing the production etc. of the world, the emancipation resulting from the realisation of it; – who knows whether all this is real or not ! The only real thing beyond dispute is man's constant obstinacy in proving that it is he who knows, is and does !

मा ण सा चा ह ट्ट

जीव, ब्रह्म, त्यांची अभिन्नता, ब्रह्म जगत्कारण वगैरे, त्याच्या ज्ञानानें मोक्ष, – हें सगळें खरें कीं नाही कोणाला ठाऊक ! खरी गोष्ट बहुधा एकच, आणि ती निर्विवादहि आहे; ती म्हणजे 'मला कळतें, मी आहें, मी करतों,' हा माणसाचा सदोदित चाललेला हट्ट !

□

वि फ लं ज न्म

नास्माभिर्नरशोणितै रणभुवां दत्तोऽभिषेकोत्सवः,
प्रासादाश्च न खस्पृशो विरचिता हृत्वा जनानां धनम् ।

द्वैताद्वैतविमर्दनाय कलहैः कण्ठा न शुष्कीकृताः, –
मातुर्यौवनसंपदोऽपहरणे चौरा वयं केवलम्! ॥

आह भर्तृहरिः – 'मातुः केवलमेव यौवनवनच्छेदे कुठारा वयम्।' तदेवात्र शब्दान्तरैः प्रतिपिपादयिषितम्।

VAIN LIFE

We did not bathe the battlefields in human blood. Nor did we erect sky-scraping palaces by robbing the people. We did not even shot ourselves hoarse in disputing dualism or monism. We thus stand only as thieves who robbed their mother of her wealth of youth!

व्यर्थ जिणें

आम्हीं माणसांच्या रक्ताच्या नद्या वाहवून रणभूमीला न्हाऊं घातलें नाही, कीं लोकांना नागवून मिळविलेल्या पैशाने गगनचुंबी हवेल्या बांधल्या नाहीत, कीं द्वैताची किंवा अद्वैताची धुळधाण करण्यासाठी घसेहि कोरडे केले नाहीत. एकूण काय, तर आईच्या उदरीं जन्माला येऊन तिचें तारुण्यधन हिरावणारे आम्ही केवळ चोर आहों!

□

१२. अञ्जलिबन्धः

WITH FOLDED HANDS

दोन्ही कर जोडून

मन्दिरप्रवेशः

स्पृष्टं स्त्रीविटचेटशूद्रयवनैर्गीर्वाणवाङ्मन्दिरं
भ्रष्टं स्यादिति तालयन्त्रितमिदं कुर्वन्ति, तेभ्यो नमः।
किं गालीषु, किमर्चनेषु, किमु वा शास्त्रेषु, किं प्रेमसु, –
सर्वे संस्कृतभाषिणो यदि, तदा देवाय कुर्यां बलिम् ॥

ADMISSION TO THE TEMPLE

We bow to those who lock the temple of the Sanskrit language out of the fear that it will be desecrated if touched by women, paramours, servants, low caste people and non-Aryans. I would really make an offering to God if all start speaking Sanskrit,

– no matter if it is used for praise or abuse, for scientific discussions or the lovers' nonsense !

मं दि र प्र वे श

बायका, तमासगीर, बारगीर, महार-मांग, अविंध यांचा स्पर्श झाला तर संस्कृत वाणीचें मंदिर विटाळेल, म्हणून जे त्याला टाळें लावतात, त्यांना साष्टांग नमस्कार असो ! मी मात्र हे सर्व-जण संस्कृत बोलूं लागले, तर देवाला पूजा बांधीन ; – मग ते संस्कृतांत शिव्या देवोत किंवा सन्मान करोत, शास्त्रार्थ करोत किंवा प्रेमाच्या बडबडी करोत !

□

ॐ शा न्तिः शा न्तिः शा न्तिः

शं नः सन्त्विह मन्त्रिणः, शमपि तद्द्वारक्षिणः सन्तु नः,
शं गुण्डाः, भिषजश्च शं, धनहराः शं, शं च नो रक्षकाः ।
शं नः सा पुरपालिका, शमपि नः कृष्णापणाधीश्वराः,
शं नः कर्मकराः, नमोऽस्तु व इदं ! मा नो वधिष्टेश्वराः ॥

'शं नो मित्रः शं वरुणः' इत्यादि वैदिकम् आशासनम् अद्यतने युगे 'यातयामं गतरसं पूति पर्युषितं च '।

BENEDICTION

May the ministers have mercy on us, may their *chaparasis*, may the goondas, may the doctors, may the thieves, may the

police, may the Municipality/Corporation, may the princes of the black market, and may also the servants ! Our salutations to you all ! My lords, do not murder us !!

'पसायदान'

मंत्री आमच्यावर कृपा करोत ! त्यांच्या दारावरचे शिपाईहि कृपा करोत ! गुंड कृपा करोत; डॉक्टर कृपा करोत; चोर करोत, शिपाई करोत ! नगरपालिका / महानगरपालिका आमच्यावर दया करो, आणि काळाबाजारवालेहि करोत ! नोकर-चाकर कृपा करोत ! तुम्हां सर्वांना आमचीं लोटांगणें ! मायबाप, आम्हांला मारूं नका !!

□

अर्पणम् (तर्पणम्?)

विसंष्ठुलस्वभावा ये गडुपृष्ठा जलोदराः ।
तेभ्योऽस्तु कण्टकाशिभ्यो भूतेभ्य इदमर्पितम् ।।

अत्र 'केयं व्याकुलता' इत्यादिः द्वितीयः श्लोकः द्रष्टव्यः। ननु 'नवनीतिशतकम्' इति हि अस्य कण्टकाञ्जलेः नामान्तरं कृतम्; सन्ति चात्र बहवः श्लोकाः अधिकाः । कथमेतत् ? – उच्यते । आम्रादिविक्रयिणामिव इदमस्माकं शतकं द्रष्टव्यम् । अथवा 'प्रास्ताविकं शब्दद्वयं' यथा शब्दसहस्रद्वयं संपद्यते तथेदं ज्ञातव्यम् । किंवा, शतकण्टकग्राहिभ्यः अयम् अधिकश्लोकात्मकः 'बोनसः' (अधिकांशः) अस्तु ।

DEDICATION

This composition is dedicated to the thornivorous creatures, who are crooked by nature, have a hump on their back, and store a lakeful of water in the belly.

स म र्प ण

जे स्वभावतः वेडेवाकडे आहेत, पाठीवर कुब्रड आणि पोटांत पाण्याचें तळें वाहणारे आहेत, त्या कांटेखाऊ प्राण्यांना (तसेंच, समंधांना) हें कवन अर्पण केलें आहे.

□

॥ श्री-उष्ट्रार्पणमस्तु ॥

परिशिष्टम्

SUPPLEMENT

पुरवणी

'वारे वारिविधानकेन्द्रम्' —रामराज्यपद्धतिः

नित्यं पुण्यपुरी 'जलं जल'मिति क्रन्दत्यखण्डस्वरं,
दृष्ट्वा जातदयैश्चिरेण विभुभिः सेत्थं समाश्वासिता —
'आम्, एवं क्रियते — क्रमेलशतं तावत्त्विदं गृह्यताम्,
"वारे वारिविधानकेन्द्र"मभितः — श्रद्धत्त — निर्मास्यते।
पोष्या गोमहिषान्वया अगणिता यस्मिन् घटोध्नीघटाः,
शुद्धं मुद्रितबाटलीषु सुलभं लोकस्य च स्याज्जलम्'॥

'VAAREY WATER COLONY'

Seeing that the city of Poona is constantly crying for water, the authorities took pity on it after a long time and made promises as follows :

‘Well, this is what we can do for you. For the time being, we shall send you a hundred camels. (Camels are known to store plenty of water in their stomach!) Rest assured that, before long, we shall erect nearby one *Vaarey Water Colony* (similar to the *Aarey Milk Colony*). Innumerable herds of cows and she-buffalos with udders as big as pitchers will be brought up there; and people will easily secure from there pure water in sealed bottles.’

‘वा रे पा णी - उ त्पा द न - कें द्र’

‘पाणी, पाणी’ असा पुण्यनगरीचा अखंड आक्रोश चाललेला पाहून बऱ्याच दिवसांनी अधिकाऱ्यांचें चित्त द्रवलें; आणि त्यांनी तिला असें आश्वासन दिलें :–

‘ठीक. आम्ही आता असें करतों. तूर्त (पाण्याची नड भागविण्यासाठी) हे शंभर उंट घ्या. (उंटाच्या पोटांत बरेंच पाणी मावतें म्हणतात!) लवकरच जवळपास (‘आरे दूध-उत्पादन-केंद्रा’-सारखें) ‘वारे पाणी-उत्पादन-केंद्र’ आम्ही उभारूं,– विश्वास ठेवा! या केंद्रांत घागरीएवढ्या कासेच्या गाईम्हशींचीं असंख्य खिल्लारें पोसलीं जातील; आणि लोकांना मोहोरबंद बाटल्यांतून वाटेल तितकें शुद्ध पाणी मिळू शकेल.’

□

वि ए त ना म

—जगदेकराष्ट्रपद्धति:

‘नान्यत्त: शरणं विना रशियया’, ‘नान्यद् विनामेरिकाम्’–
इत्या नाभितलाज्जना: कलकलं स्वच्छन्दत: कुर्वते।

स्वप्नो यास्यति चेदयं सफलतां तेषां यदृच्छावशात्,
– शङ्का नास्ति – 'विएतनाम' विभवैः संगंस्यते भारतम् ।
'औदीच्या' इति, 'दक्षिणाजुष' इति द्वेषाज्ज्वलन्तो जनाः
प्राशिष्यन्ति परस्परस्य रुधिरं, संपत्स्यते भस्म भूः ! ॥

VIETNAM

'We have no other shelter than Russia;' 'None else but America;'– thus do different people shout at will at the top of their voice. If, by any chance, their dreams come true, India will no doubt enjoy the prosperity that prevails in Vietnam today ! Thus, shouting 'We belong to the North,' or 'We belong to the South,' and burning with bitter hatred, people will fly at one another's throat and the land will be simply reduced to ashes !

विएतनाम आणि भारत

'आपल्याला रशियाखेरीज अन्य तरणोपाय नाही !'
'साफ चूक. आपल्याला अमेरिकेवाचून अन्य गति नाही !'

याप्रमाणे लोक बेंबीच्या देठापासून यथेच्छ आक्रोश करीत असतात. जर दैवयोगाने त्यांचीं हीं स्वप्नें सत्यसृष्टींत उतरलीं तर – शंकाच नको ! – विएतनाममधली भरभराट भारतांत अवतरेल ! आणि –

आणि 'आम्ही उत्तरेंतले !', 'आम्ही दक्षिणेंतले !' असें गरजत, द्वेषानें पेटलेले लोक एकमेकांच्या नरडीचा घोट घेऊं लागतील ! आणि भूमि ? – भूमीची राखरांगोळी होईल !!

□□

स र्व श क्तिः वा क् —लोकाग्रणीपद्धतिः

सृष्टौ कश्चन, कश्चनाप्यधिकृतः क्षेमे, क्षये कश्चन,
ब्रह्माण्डस्य किलास्य केचिदबुधाः कार्ये विभक्ति जगुः ।
शक्ति वाक् प्रकटय्य पूर्वमुभयोः, कृत्वाधुना च क्षयं
सामानाधिकरण्यमाविरकरोत् कार्यत्रयस्यात्मनि ।।

THE OMNIPOTENT SPEECH

Of this vast universe, someone (i. e. *Brahmadeva*) is appointed for creation, another (i. e. *Vishnu*) for its sustenance, and yet another (i. e. *Shiva*) for its destruction, — thus some fools have made a division of work. Speech, however, having already manifested its potency in regard to the first two functions, and now undertaking destruction, has conclusively proved that all the three functions are exclusively vested in it! (This refers to the recent linguistic riots in the South.)

स र्व स म र्थ भा षा

या ब्रह्मांडाच्या म्हणे उत्पत्तीच्या कामीं कोणा एकाची (ब्रह्मदेवाची) नेमणूक झाली आहे; राखणीच्या कामीं दुसऱ्या कोणाची (विष्णूची); संहाराच्या कामीं आणखी कोणाची तरी (रुद्राची); — अशी कांही वेडपटांनी जगाच्या कामांची वाटणी करून टाकली आहे. वस्तुतः यांपैकी पहिल्या दोन कार्यांत आपली शक्ति भाषेने यापूर्वीच प्रकट केली असून आज तिने प्रलयहि मांडला आहे; आणि अशा प्रकारे हीं तिन्ही कार्ये एकट्या आपल्याच हातीं असल्याचें सिद्ध केलें आहे.

□

त्रो टि स म्पः   —जीवनोद्योगपद्धतिः

'सम्पे शक्तिरवस्थिता कलियुगे'—स्मृत्वेति नूतनां स्मृतिं
सर्वस्त्रोटिगणः पुरेऽत्र सहसाकार्षीज्जलस्तम्भनम् ।
प्रास्तौषीत् समयं च—'कार्यविरतिर्वर्षस्य षाण्मासिकी,
घण्टामात्रमुपस्थितिः प्रतिदिनं, त्रैमासिको बोनसः' ॥

STRIKE OF THE WATER - TAPS

'Strike is power in this age of *Kali,*'—knowing this doctrine of the modern ethical code, all the taps in this city (of Poona) suddenly struck work. They made the following demands : 'Six months' Privilege Leave every year; duty – one hour a day; and three months' bonus' !

न ळां चा सं प

'सम्पे शक्तिः कलौ युगे ! – कलियुगांत बळ संपामध्ये' हें नव्या स्मृतींतलें वचन ध्यानांत घेऊन या पुण्यपुरींतले सगळे नळ एकाएकी (बैठ्या) संपावर गेले. त्यांनी आपल्या मागण्या मांडल्या, – 'वर्षांतून सहा महिने रजा. रोज फक्त एक तास काम. तीन महिन्यांचा बोनस.'

□

व्या ख्या न म्   —विद्याविद्यार्थिपद्धतिः

विख्याता विदुषां पुरीति, विषयः पूज्यो जनानामिति,
वक्ता दूरत एष्यतीति, फलकाः सर्वत्र संसञ्जिताः ।
क्लृप्तो मण्डप आयतो, विनिहितास्तारा: स्वरक्षेपकाः,

श्रोतारो दश पञ्च !

'भूगिलतु मां !'– संयोजकः काङ्क्षति ॥

A MAMMOTH SPEECH PROGRAMME

Considering that this is a reputed city of the learned, and that the appointed topic is esteemed by the people, and that the speaker is coming from afar, placards announcing details of the talk were exhibited everywhere; a spacious pandal was constructed; amplifiers of a very high capacity were fixed. (Everything was perfectly arranged. The clock struck the hour of the speech; but alas !) There were only five or ten listeners ! How fervantly did the organiser of the programme prayed in his mind : 'O Mother Earth ! Take me in, this very moment !'

– टो ले जं ग व्या ख्या न

गांव विद्वानांचें आगर; विषय सर्व लोकांच्या आदराला पात्र असा; व्याख्याता फार दुरून आणविलेला;– हें सर्व लक्षांत घेऊन संघटकांनी सगळीकडे मोठाले फलक लटकावले. भला मोठा मांडव घातला. करडचा आवाजाचे ध्वनिक्षेपक लावले.

व्याख्यानाची घटका भरली. श्रोते सबंध दहापांच होते ! संघटकांच्या मनांत जप चालला होता, – 'धरणी माते, घे मला पोटांत !'

जीवनं त्यज्यताम्   —विद्याविद्यार्थिपद्धतिः

'वेदाः संस्कृतभारती च परमो देशस्य नः शेवधिः,
विख्यातं भुवि तेन भारतमिदं, तेनैव राष्ट्रं वयम्।
तं गोपायत, तं च वर्धयत'; 'भोः! वृत्तिः कथं वर्तताम्?'
'त्यागात्'; 'कस्य ?' 'धनस्य'; 'नास्ति न इदं !'
'तत् जीवनं त्यज्यताम् !' ॥

SACRIFICE YOUR LIFE !

'The *Vedas* and the Sanskrit language is the most precious treasure of our country. India is known abroad for them; and also, we owe our existence as a nation to them only. You must preserve it, and expand it too !'

The speaker concluded. A listener asked, 'And Sir, what shall we live on ?'

'You must sacrifice.'
'Sacrifice ?– Sacrifice what ?'
'Of course, wealth !'
'But Sir, wealth we have none.'
'Then you must sacrifice your life !'

जीव द्या !

'वेद आणि संस्कृत भाषा म्हणजे आपल्या देशाची अनमोल दौलत आहे. यामुळेच जगांत भारताचें नांव झालें; आणि आपण राष्ट्र झालों तेंहि यामुळेच. ही दौलत जपा आणि तींत भर टाका !'

व्याख्यान संपलें. एका श्रोत्याने विचारलें, 'हें सगळें करणाऱ्यांचें पोट भरण्याची व्यवस्था काय !'

'असला क्षुद्र स्वार्थ काय कामाचा ?' वक्ते गरजले; 'त्यांनी त्याग केला पाहिजे !'

'त्याग ? कशाचा ?'

'कशाचा म्हणजे ? धनाचा, – पैशाचा ?'

'अहो, पण हेंच तर त्यांच्याकडे नाही !'

'मग त्यांनी जें असेल त्याचा त्याग केला पाहिजे. दुसरें कांही नसेल तर प्राणत्याग केला पाहिजे !'

□

देशवत्सलः —गार्हस्थ्यपद्धतिः

'कन्या यादृशतादृशी यदि, तथा सास्तु- ,-अस्मि सिद्धः परं
तामुद्वोढुमहं, यदि श्वशुरतो लप्स्ये सहस्राणि षट् ।
देशार्थे,' – 'यदि तर्हि तावदपरं लब्ध्वा तदर्थं धनं
नूनं तामनुमंस्यसेऽन्यपुरुषैः संसारकार्येष्वपि !' ॥

THE PATRIOT

'Let the girl be as she might be, I am prepared to marry her provided I get (a dowry of) six thousand rupees, – not for me, but for the country !'

'Well, then if you get an equal amount again, – of course, for the country, – I have no doubt that you will permit her relations with other men too !'

देशभक्त

मुलगी कसली वाटेल तसली चालेल; मी लग्नाला तयार आहे. फक्त, सासऱ्याकडून मला सहा हजार रुपये मिळाले पाहिजेत, – केवळ देशासाठी, देशकार्यासाठी !'

'हो का ? तर मग तुला देशासाठी आणखी तेवढी रक्कम मिळाली, तर तू नक्कीच तिला दुसऱ्या पुरुषाबरोबर संसारहि करू देशील ! नाही का ?'

□

परिशुद्धिः, परिवृद्धिः

प्रथमः अङ्कः पृष्ठस्य । तदुत्तरं रेखायाः परतः अङ्कः पङ्क्तेः । परिशुद्धिः 'आदेश'रूपा । परिवृद्धिः 'आगम'-रूपा । आदेशे विवक्षिते अशुद्धः 'स्थानी' न निर्देक्ष्यते; स हि स्वस्थाने उपलभ्येतैव, 'उक्तार्थानां हि अप्रयोगः' । आगमे तु विवक्षिते यस्मात् परतः स इष्यते, स शब्दः ग्रहयोः (brackets) मध्ये निर्देक्ष्यते ।

०१३–२५	: प्रमुदितो भृशमन्तरात्मा
०४१–७	: संभूय
०४१–१२	: कृच्छ्रं
१६–७	: (virtues) ?
२०–(चरमा)	: इत्यादिश्रुतिः
२४–२	: हें मिळत
३१–१४	: (मोक्षः।) द र ति – भ्वादिः दृ-धातुः भये प्रसिद्धः ।
३२–२४	: (रॉकेलसाठी,) ही पाण्यासाठी,
४८–१९	: (फोड,) वस्तू / पैसा
४९–१५	: जलचर प्राणी,
५९–२	: दंशमशकं
६५–२०	: (पाणिनिः।) अत्र पूरणिका – इदं सूत्रं संप्रति निरवकाशम्; अधुना लङ्कापतेः (अर्थात् सिंहलामात्यस्य) स्त्रीत्वाभावात् । तथापि श्लोकः भूतार्थं निर्दिशति; तेन नास्य बाध्यता शङ्कनीया । ननु का अत्र सीता ? – सिंहलस्थाः भारतीयाः स्युः ।

५–१८ : मेलोंच !

९२–४ : funeral

९२–२१ : मिस्गाइडेड

९२–२३ : Misguided

११०–२१ : दिशंश्च सततं

११३–५ : लीये धनब्रह्मणि ! ॥

१२१–८ : (श्लोकानन्तरं टिप्पनी –) किमयं 'सुधाह्रदः संस्कृतविद्याध्ययनं स्यात् ? स्यादपि । एवं हि संस्कृतपण्डिताः मन्यन्ते (न तु प्रकाशम् अङ्गीकुर्वन्ति) ।

१३०–२ : ग्रन्थ ! त्वदीया

१३४–१४ : (सुरासरित् ।) इयं भागीरथ्याः अपि संज्ञा स्यात् ।

१६०–१० : (इतिहासपण्डिताः) 'शेजवलकर'नामानः । अत्र दृश्यताम् – 'सत्यकथा'-मासिकम्, फेब्रु. १९६४; श्री. सदाशिव-आठवले-महाभागानां लेखः ।

१६१–२१ : sentence

१६४–२० : sisters

१७०–१३ : हृदयं

१८८–४ : क्रमेलकशतं

१९०–५ : (श्लोकस्य टिप्पनी –) इदं पद्यम् अद्यापि अपर्युषितं दक्षिणभारतीयानां हिन्दीविरोधिनं प्रक्षोभम् अभिकरोति, यस्मिन् महाजनानामपि स्फूर्जथुः आसीत् – 'हिन्दी व्रजतु कच्चरम् !' इति ।

१९३–२ : (श्लोकस्य टिप्पनी –) अत्र पूरणिका – संयोजकः काङ्क्षति, – सत्यम्; यावत् व्याख्यानान्तरं न संयोजयति । संयोजिते च व्याख्यानान्तरे पुनरपि 'धाता यथापूर्वमकल्पयत्' भवति । वक्रे विधौ का गतिः ?